सिक्रेट्स ऑफ फायनान्शियल फ्रीडम

रहस्य आर्थिक स्वातंत्र्याचे

नितीन घाडगे

धनश्री सगरे

सिक्रेट्स ऑफ फायनान्शियल फ्रीडम

रहस्य आर्थिक स्वातंत्र्याचे

सिक्रेट्स ऑफ फायनान्शियल फ्रीडम

रहस्य आर्थिक स्वातंत्र्याचे

लेखक:

नितीन घाडगे

धनश्री सगरे

WINGS PUBLICATION
WE GIVE WINGS TO YOUR DREAM

Disclaimer

This book has been published with all reasonable efforts taken to make the material error-free after the consent of the author. This book is sold subject to the condition that it shall not, by way of trade or otherwise, be lent, resold, or otherwise circulated without the copyright owner's prior written consent in any form of binding or cover other than that in which it is published and without a similar condition including this condition being imposed on the subsequent purchaser and without limiting the rights under copyright reserved above, no part of this publication maybe reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any other means without the permission of the copyright owner.

WINGS PUBLICATION
WE GIVE WINGS TO YOUR DREAM

Registered Office- 907-Sneh Nagar, Sapna Sangeeta Road,
Agrasen Square, Indore – 452001 (M.P.), India
Website: http://www.wingspublication.com
Email: mybook@wingspublication.com

First Published by WINGS PUBLICATION 2022
Copyright © नितीन घाडगे व धनश्री सगरे 2022

Title: सिक्रेट्स ऑफ फायनान्शियल फ्रीडम
Price: INR 699 / $15
All Rights Reserved.
ISBN 978-93-93966-41-4

LIMITS OF LIABILITY/DISCLAIMER OF WARRANTY

The Author of this book is solely responsible and liable for its content including but not limited to the views, representations, descriptions, statements, information, opinions and references. The information presented in this book is solely compiled by the Author from sources believed to be accurate and the Publisher assumes no responsibility for any errors or omissions. The information is not intended to replace or substitute professional advice.

The Content of this book shall not constitute or be construed or deemed to reflect the opinion or expression of the Publisher. Publisher of this book does not endorse or approve any content of this book or guarantee the reliability, accuracy or completeness of the content published herein and do not make any representations or warranties of any kind, express or implied, including but not limited to the implied warranties of merchantability, fitness for a particular purpose. The Publisher shall not be held liable whatsoever for any errors, omissions, whether such errors or omissions result from negligence, accident, or any other cause or claims for loss or damages of any kind, including without limitation, indirect or consequential loss or damage arising out of use, inability to use, or about the reliability, accuracy or sufficiency of the information contained in this book. All disputes are subject to Indore (M.P.) jurisdiction only.

पोचपावती

आम्ही आमच्या वचनबद्ध गुंतवणूकदार, वाचकांचे आणि चाहत्यांचे मनापासून त्यांनी दिलेल्या उत्साहवर्धक प्रतिसादासाठी आभार मानतो.

मी **नितीन घाडगे,** हे पुस्तक माझे वडील श्री. लक्ष्मण घाडगे यानां समर्पित करतो, ज्यांनी मला इतरांच्या आयुष्यामध्ये नेहमीच कोणत्याही प्रकारचे मूल्य कसे करावे हेच सतत शिकवले होते. माझ्या वडीलांनी त्यांच्या आर्थिक जीवनामध्ये बचतीचे आणि बजेट चे काही नियम आखले होते, त्यांच्याकडून मिळालेली अमूल्य भेट या पुस्तकात मी सादर केली आहे. माझी आई संगीता, माझी पत्नी प्रीती, माझी बहीण हेमांगी, माझी मुलगी हिरण्या आणि आमचे भाऊजी श्री सचिन भोसले यांचे मी मनापासून आभार मानतो ज्यांनी मला सतत या कार्यामध्ये पुढे जाण्यासाठी उच्च दर्जाचे सहकार्य आणि प्रोत्साहन दिले.

हे ज्ञान जास्तीत जास्त जनतेपर्यंत पोहोचवून त्यांना आर्थिक साक्षरता देण्याच्या माझ्या मिशनमध्ये मला नेहमीच सहकार्य करणाऱ्या माझ्या व्यावसायिक भागीदार धनश्री सगरे यांचे देखील मी मनापासून आभार मानतो.

मी **धनश्री सगरे** हे पुस्तक माझे वडील श्री विश्वनाथ पाटील यांना समर्पित करते. इतरांच्या आयुष्यामध्ये काही ना काही योगदान सतत करत राहणे, या वडिलांच्या स्वभाव गुणांचा वारसा मी देखील पुढे घेऊन जात आहे. माझी आई रंजना, माझे सासरे श्री प्रकाश, माझ्या सासू शोभा, माझे पती प्रवीण, माझी दोन मुलं श्रावणी आणि स्वरूप आणि माझे दीर प्रशांत त्याच्यां पत्नी अमृता आणि त्यांचा मुलगा आर्य आणि माझ्या 2 बहिणी भाग्यश्री आणि रूपाली यांनी दिलेल्या सहकार्यासाठी मी मनापासून त्यांचे आभार मानते.

आर्थिक नियोजन आणि वैयक्तिक वित्त या विषयावर प्रावीण्य मिळवण्यासाठी वेळो वेळी मला मदत करणारे माझे गुरु श्री नितीन घाडगे यांचे मी मनापासून आभार मानते.

आमच्या यशस्वी गुंतवणूकदारांचे आम्ही मनापासून आभार मानतो, ज्यांनी आम्ही बनविलेल्या आर्थिक योजनेचे काटेकोर पालन करून त्यांच्या आयुष्यामध्ये आर्थिक स्वातंत्र्य गेल्या दहा ते बारा वर्षांमध्ये साध्य केले.

आम्ही शिकविलेल्या आर्थिक नियोजनाच्या प्रक्रियेवर आणि पैशाच्या तत्वांवर दृढ विश्वास ठेवणाऱ्या वाचकांचे आणि गुंतवणूकदारांचे आम्ही मना पासून आभार मानतो.

आर्थिक नियोजनाच्या या प्रवासामध्ये आमच्या ग्राहकांचे आर्थिक नियोजन करणाऱ्या आमच्या कंपनीच्या आर्थिक सल्लागारांचे आणि कर्मचारी वर्गांचे देखील आम्ही मनापासून आभार मानतो.

आमच्या आयुष्यामध्ये आलेल्या सर्व व्यावसायिक गुरुंचे मनापासुन आभार मानतो. ज्यांनी आम्हाला कठीण परिस्थितीमध्ये देखील आपले कौशल्य सतत वाढवून, जास्तीत जास्त लोकांपर्यंत सहज पोहोचून, कशा पद्धतीने त्यांच्या आयुष्यातील समस्या सोडवून त्यांच्या आयुष्यात अधिक मूल्य द्यायचे हे सतत शिकवले.

आमचे गुरु श्री पुट्टु स्वामी गवडा आणि धर्मेंद्र सतपाटी यांचे आम्ही विशेष आभार मानतो. त्यांनी आम्हाला आमच्या व्यवसायामध्ये सतत वाढ कशी करायची याचे सखोल ज्ञान वेळोवेळी दिले आहे. ज्यामुळे आम्हाला आमच्या व्यवसायांमध्ये प्रगतीचा आलेख उंचविण्यास नेहमी मदत होते.

अखेरीस आमच्या पहिल्या पुस्तकाचे प्रकाशन करणाऱ्या विंग्स पब्लिकेशन कंपनी आणि कंपनीच्या सर्व कर्मचाऱ्यांचे आम्ही मनापासून आभार मानतो.

नितीन घाडगे - आर्थिक प्रशिक्षक

धनश्री सगरे - आर्थिक प्रशिक्षक

प्रस्तावना

तुम्ही कदाचित हे पुस्तक उचलले असेल आणि विचार केला असेल, सिक्रेट्स ऑफ फायनान्शिअल फ्रीडम नक्की आहे तरी काय? हे पुस्तक मला कशा पद्धतीने मदत करेल?

सिक्रेट्स ऑफ फायनान्शियल फ्रीडम पुस्तक लिहिण्यामागचे प्रमुख कारण, लेखकांना असे सतत वाटत होते की प्रत्येक व्यक्तीने आर्थिक स्वातंत्र्य मिळवून त्याला हवे असलेले आयुष्य जगणे फार गरजेचे आहे. पण पैसे कमविणे आणि पैशाची वाढ करणे या दोघांमधील फरक बऱ्याच व्यक्तींना आजही माहीत नाही. त्यामुळे आर्थिक स्वातंत्र्य हे ध्येय साध्य करण्यासाठी बोटावर मोजाव्या इतक्या लोकांनी प्राधान्य दिले. लेखक नितीन घाडगे यांनी वयाच्या 30 व्या वर्षी स्टॉक ब्रोकिंग कंपनी मधील चांगल्या पगाराची नोकरी सोडून, आर्थिक नियोजन कार म्हणून काम करायला सुरुवात केली. साधारण दोन वर्ष वेगवेगळ्या प्रशिक्षण संस्थांसोबत काम करून लेखकांनी या विषयावरती प्राविण्य मिळवले आणि वयाच्या 32 व्या वर्षी **हिरण्या फायनान्शिअल प्लॅनर कंपनीची** स्थापना केली.

लेखिका धनश्री सगरे यांनीदेखील वयाच्या 26 व्या वर्षी त्यांची चांगली नोकरी सोडून व्यावसायिक कर तज्ञ होण्याचे ठरविले. नितीन सरांसोबत त्याच दरम्यान त्यांची भेट झाली आणि त्यांनी देखील या विषयावर सरांच्या उत्तम मार्गदर्शनाखाली प्राविण्य मिळविण्यास

सुरुवात केली. या दरम्यान हजारो लोकांच्या सोबत एकत्रित पणे आर्थिक नियोजनावर काम करत राहिल्याने लेखकांनी प्रत्येक व्यक्तीचं आर्थिक जीवन फार जवळून पाहिले आहे.

बऱ्याच व्यक्तींची खूप मोठी गैरसमजूत झालेली आहे, आपण खूप सारे पैसे कमविले की आपण श्रीमंत सहज बनू शकतो. सिक्रेट्स ऑफ फायनान्शिअल फ्रीडम हे पुस्तक ज्या व्यक्तींना पुढील दहा ते पंधरा वर्षांमध्ये आर्थिक स्वातंत्र्य आणि आर्थिक दृष्ट्या संपन्न व्हायचे आहे त्यांच्यासाठी पर्याय आणि उपाय आहे. सिक्रेट्स ऑफ फायनान्शियल फ्रीडम या पुस्तकामध्ये लेखकांनी साध्या आणि सोप्या पद्धतीने तुम्ही तुमच्या आयुष्यामध्ये आर्थिक स्वातंत्र्य कसे मिळू शकता हे दिले आहे. हे पुस्तक तुमची पैशाविषयीची आणि संपत्ती विषयाची भीती आणि असुरक्षितता दूर करेल. या पुस्तकामध्ये श्रीमंत लोक कशा पद्धतीने त्यांची मानसिकता विकसित करतात याचे ज्ञान मिळेल. या पुस्तकामध्ये आर्थिक उद्दिष्ट कशा पद्धतीने बनवायचे आणि बनवलेली आर्थिक ध्येय एका वेगळ्या विचारसरणीने कशी साध्य करायची हे अत्यंत सोप्या भाषेत दिले आहे. या पुस्तकांमधील तत्त्व आणि सूत्र तुमच्या आर्थिक जीवनामध्ये अधिक आत्मविश्वास वाढवण्यास मदत करतील. ज्या वेळेस तुम्ही या पुस्तकात दिलेल्या आर्थिक तत्त्वांवर आणि सूत्रांवर काम करायला सुरुवात कराल, त्या वेळेस तुम्हाला देखील जाणवेल आर्थिक स्वातंत्र्य मिळवणे तुमच्या साठी देखील सहज आणि सोपे आहे.

या पुस्तकांमध्ये दीर्घकालीन संपत्ती मिळवण्याचा शास्त्रशुद्ध मार्ग लेखकाने दिला आहे. या मार्गांचा पाठपुरावा केला तर तुम्ही देखील आर्थिक स्वातंत्र्य मिळवू शकता. या पुस्तकामध्ये पैशाचा मानसशास्त्र कशा पद्धतीने असायला हवे हे देखील सांगितले आहे. या पुस्तकामध्ये आर्थिक नियोजन तुमच्यासाठी किती महत्वाचे आहे आणि ते करताना कोण कोणते प्रमुख नियम आहेत हे देखील सोप्या पद्धतीने सांगितले आहे. बऱ्याच व्यक्तींकडे पैसे पुरत नाही, त्यांच्या आर्थिक जीवनामध्ये

असे का होते, यामधून बाहेर कसे यायचे याचे उत्तम मार्गदर्शन या पुस्तकांमध्ये केले आहे. बऱ्याच व्यक्ती कर्जाच्या दलदली मधून बाहेर कधीच येत नाही, लेखकांनी या दलदली मधून बाहेर पडण्याचे काही उपाय या पुस्तकात दिलेले आहेत.

सिक्रेट्स ऑफ फायनान्शिअल फ्रीडम पुस्तक तुमच्या आर्थिक जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी कोण कोणते आर्थिक नियम आवश्यक आहे हे सोप्या पद्धतीने मांडत आहे. आर्थिक ध्येय निश्चित करणे, त्या उद्दिष्टांना साध्य करण्यासाठी नियोजन करणे, नियोजनावर कृती करणे या सर्व संकल्पना शाळा, महाविद्यालय, व्यवस्थापन वर्ग, नेतृत्व प्रशिक्षण शिबिरामध्ये शिकवल्या जात नाही.

पैशाचे नियोजन करणे हा आपल्या आयुष्यामधील महत्त्वाचा प्रकल्प आहे, हे आपल्याला कोणी देखील शिकवत नाही. त्यामुळे पैशाच्या नियोजनासाठी फार कमी व्यक्ती वेळ देतात. या पुस्तकांमध्ये लेखकांनी तुम्ही तुमच्या पैशाला वेळ देणे का गरजेचे आहे, हे शास्त्रशुद्ध पद्धतीने सांगितले आहे. बऱ्याच व्यक्ती त्यांचा कष्टाने कमाविलेल्या पैशाने जास्तीचा परतावा मिळवून दिला पाहिजे या आशेने गुंतवणूक केलेली असते. गुंतवणूक करण्यापूर्वी कोणत्याच प्रकारचे आर्थिक ध्येयं नसल्याकारणाने जास्तीत जास्त लोक आंधळेपणाने गुंतवणूक करायला सुरुवात करतात. या पुस्तकामध्ये लेखकांनी गुंतवणूक करण्यापूर्वी कोणती खबरदारी घ्यावी आणि गुंतवणुकीची जोखीम कशी पडताळून पहावी हे सोप्या भाषेत दिलेले आहे.

या पुस्तकांमध्ये लेखकांनी श्रीमंत होण्यासाठी सहा पायऱ्या दिलेल्या आहेत. या पायऱ्यांचा अवलंब करून गेल्या बारा वर्षांमध्ये लेखक नितीन घाडगे आणि धनश्री सगरे आणि त्यांच्या कर्मचारी वर्गासोबत काम करून हजारो लोक आर्थिक स्वातंत्र्य मिळविण्यात यशस्वी झाले.

सिक्रेट्स ऑफ फायनान्शिअल फ्रीडम या पुस्तकांमध्ये श्रीमंत

होण्यासाठी मालमत्ता वर्गीकरण कशा पद्धतीने करायचे हे लेखकाने सोप्या भाषेत दिलेले आहे.

आज भारतामध्ये बऱ्याच व्यक्तीने म्युच्युअल फंडामध्ये गुंतवणूक करायला सुरुवात केलेली आहे. पण त्यापैकी 95 टक्के व्यक्तींना म्युच्युअल फंडाची गुंतवणूक कशा पद्धतीने करायची, याचे साधे ज्ञान देखील नाही. लेखकाने या पुस्तकांमध्ये म्युच्युअल फंड मधील गुंतवणुकीने देखील तुम्ही कशा पद्धतीने श्रीमंत होऊ शकता हे दिलेले आहे.

या पुस्तकामध्ये लेखकांनी अत्यंत साध्या आणि सरळ भाषेमध्ये आर्थिक नियोजन करून तुमच्या आयुष्यामध्ये आर्थिक स्वातंत्र्य कसे मिळवू शकता हे सांगितले

TESTIMONIALS

When it comes to money management, one cannot overlook words like planning discipline, patience and conviction. To me these four most aptly define who Mr. Nitin Ghadge is. Financial Planning has been his passion, Discipline his way of life be it money management or health management.

His deep conviction in using the tools of money management to make a difference in the lives of people has been most impressive. Nitin to me is like a Rock of Gibraltar, very solid, very strong, very sure.

His knowledge and dedication to the subject of Personal Finance is unparalleled.

Every chapter of this book will step by step take you to the point from where you will be able to spread your wings and take off on the journey of financial freedom.

I am certain that both Mr. Nitin Ghadge, Mrs. Dhanashree Sagare & the Hirannya Financial team will cross several milestones in their endeavour to build a better life for people by using the tenets of financial planning.

Heartiest congratulations and best wishes to both Nitin & Dhanashree for having authored this masterpiece.

This isn't just another book. This is a collection of invaluable secrets that can change the course of one's life and liberate him or her from money related stress by showing the Path to Abundance.

Many congratulations and best wishes.

DHARMENDRA SATAPATHY

Speaker & Trainer

Founder & Director of Next Level Education Private Limited

Creating Wealth & Achieving Financial Freedom Requires a Focus, Consistent Efforts & A Strict Disciplines. All these are not possible to consistently maintain if you do not have a proper coach & guide. Mr. Nitin Ghadge, Mrs. Dhanashree Sagare & Entire HFP Team is one of the Best Financial Planning & Financial Freedom Coaching Team as i have witnessed them for last 6 to 7 years in various interaction.

Mr. Nitin Ghadge is not only known for helping people to develop good money habits but he is also helping people to develop solid habits in all the other areas like Health, Relationship & Personal Development etc...

If anybody is genuinely interested to Achieve Financial Freedom & Financial Abundance then this is one of the Ultimate Book because it provides Simple, Easy & Effective Secrets, and Steps & Principles which can be followed by anyone.

I wish the great success to Mr. Nitin, Mrs. Dhanashree & HFP Team & also wish that this book becomes the Best Seller Book.

PUTTASWAMY B GOWDA

Author, Speaker & Trainer

Author of the Book - "Your IQ is Not Equal to Your FQ"

Co - Founder & Director of Next Level Education Private Limited

Mr. Nitin Ghadge has been one of the earliest adopters of financial planning process in India. His passion and energy for helping consumers live a great financial life and achieve financial freedom is commendable which shows in his workshops and coaching programs.

The authors bring in their entire experience with clients and participants in this wonderful book on complete money management. A must read for everyone who wants his or her family to achieve financial freedom. I wish the great success to Mr. Nitin, Mrs. Dhanashree & HFP Team & also wish that this book becomes the Best Seller Book.

SADIQUE NEELGUND

Speaker & Coach

Founder of Network FP Pvt. Ltd.

अनुक्रमणिका

पोचपावती *i*
प्रस्तावना *iv*
Testimonials *viii*

 # 1. श्रीमंतांची मानसिकता विकसित करा 3
 # 2. दीर्घ कालीन संपत्ती निर्मितीचा क्रम 15
 # 3. मानसशास्त्र पैश्याच्या नियोजनाचे 27
 # 4. आर्थिक नियोजनाची त्रिसूत्री 43
 # 5. आर्थिक नियोजनाचे 10 प्रमुख नियम 53
 # 6 आर्थिक ध्येय कसे ओळखावे? 63
 # 7. आर्थिक जीवनातील 10 मोठ्या चुका 75
 # 8. पैसे वाचविण्याचे 8 उत्तम मार्ग 87
 # 9. उत्तम परतावा मिळविण्याचे रहस्य 93
 # 10. आपत्कालीन निधी एक काळाची गरज 101
 # 11. कर्जाच्या विळख्यातून बाहेर पडण्याचे काही उपाय 115
 # 12. महत्व कॅश फ्लो आणि बजेटिंगचे 121
 # 13. वीमा नियोजन काळाची गरज 137
 # 14. विम्याबद्दल असलेल्या 10 गैरसमजूती 159
 # 15. गुंतवणूकीचे विविध पर्याय आणि जोखीम 167
 # 16. दीर्घकालीन आणि अल्पकालीन गुंतवणुकीचा खेळ 187
 # 17. मालमत्ता वर्गीकरण - संपत्ती निर्मितीचा मार्ग 193
 # 18. म्युच्युअल फंड संपत्ती निर्मितीचा एक उत्तम पर्याय 201
 # 19. नियोजन आर्थिक स्वातंत्र्याचे 225

Lesson # 1

श्रीमंतांची मानसिकता विकसित करा

पैसा हा आपल्या आयुष्यामध्ये महत्त्वाचा अविभाज्य घटक आहे. असा हा महत्त्वाचा घटक याचे नियोजन जर आपल्या नियंत्रणामध्ये नसेल तर आपल्या आयुष्यामधील इतर घटक देखील आपल्या नियंत्रणा बाहेर जाऊ शकतात.

आपल्या शिक्षण पद्धतीने आपल्याला शालेय जीवनात आणि महाविद्यालयात बिलकुल देखील शिकवले नाही, की आपल्या आयुष्यामध्ये सर्वात महत्वाचे चार प्रकल्प असतात. जाणून घ्या हे चार प्रकल्प कोणत्या प्रकारचे असतात.

1. आरोग्य

2. नातेसंबंध

3. करियर

4. पैसा

भारताला 15 ऑगस्ट 1947 ला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यावेळच्या सरकारने सर्व नागरिकांनी शिक्षण घेणे हे बंधनकारक आहे असा नियम बनविला. देशाला स्वातंत्र्य मिळून आज जवळपास 75 वर्ष झाले आहेत आणि या 75 वर्षांमध्ये फक्त 74% भारतीयांनी त्यांचे शिक्षण पूर्ण केले.

असे असून देखील भारतामध्ये 25 ते 44 वयोगटांमध्ये 27% लोकांनी आर्थिक साक्षरता मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे शालेय जीवनामध्ये आणि महाविद्यालयांमध्ये आर्थिक

साक्षरतेचे शिक्षण दिले नाही.

आज आपली शिक्षण पद्धती इतकी आधुनिक झाली असून देखील, बऱ्याच व्यक्ती उच्च शिक्षण घेतल्यानंतर चांगली नोकरी मिळविण्या मध्ये सफल होतात. पण त्या पैकी फक्त एक टक्का व्यक्ती त्यांच्या आयुष्यामध्ये आर्थिक स्वातंत्र्य मिळविते. हे होण्यामागचे प्रमुख कारण लहानपणापासून आपल्या मनामध्ये पैशाविषयी काही नकारात्मक गोष्टी शिकवल्या जातात.

उदाहरणार्थ लहानपणापासून आपल्याला शिकवले जाते.

1. पैसा कमवण्यासाठी खूप कष्ट करावे लागतात
2. पैसा कमवण्यासाठी नोकरीशिवाय कोणताच पर्याय उपलब्ध नाही.
3. पैसा हा सहज कमविता येत नाही.
4. जेवढी गरज असेल तेवढाच पैसा कमविला पाहिजे.
5. जास्त पैसे असतील तर तुम्हाला चुकीच्या सवयी लागतील.
6. जास्त पैसा तुम्हाला कपटी आणि लोभी बनवितो.

अशा बऱ्याच समजुती आपल्याला लहानपणापासून आपल्या मनामध्ये बिंबवल्या आहेत. 1970 च्या दशकातील चित्रपटांमध्ये देखील नायक हा अत्यंत गरीब आणि प्रामाणिक व्यक्ती दाखविली आहे. त्याच बरोबर त्याच्या उलट असलेला खलनायक हा नेहमीच श्रीमंत आणि वाईट भूमिकेमध्ये समोर आलेला आहे. याच गोष्टी पाहून आपण आपल्या मनामध्ये पैशाविषयी काही विशिष्ट मानसिकता बनवली आहे आहे आणि फार लोकांच्या मनामध्ये ही मानसिकता वर्षानुवर्ष कायम राहिली आहे.

आपल्या आयुष्यामधील अठरा ते वीस वर्ष आपण अशा शिक्षण

पद्धतीमध्ये घालविली आहेत, जिकडे आर्थिक साक्षरता आर्थिक स्वातंत्र्य संपत्ती निर्मिती कशी करावी याचे साधे शिक्षण देखील आपल्याला मिळाले नाही.

लेखक नितीन घाडगे आणि धनश्री सगरे यांनी गेल्या बारा वर्षांमध्ये 80 हजार पेक्षा जास्त व्यक्तींना आर्थिक साक्षरतेचे ज्ञान आणि महत्व पटवून दिले. या बारा वर्षांमध्ये त्यांनी बऱ्याच वेगवेगळ्या व्यक्तींचे आर्थिक जीवन फार जवळून पाहिले आहे. यामध्ये त्यांनी बऱ्याच डॉक्टरांचे, आयटी इंजिनियरचे, बँकेमध्ये डायरेक्टर आणि व्हाईस प्रेसिडेंट, इंटरनॅशनल कंपनीमध्ये उच्च दर्ज्या वरती असलेल्या व्यक्तींचे, त्याच बरोबर कारकिर्दीची सुरुवात करणाऱ्या व्यक्तीचे आर्थिक जीवन हाताळले आहे.

या सर्व व्यक्तींमध्ये जर एखादी कॉमन गोष्ट पाहिली तर प्रत्येक व्यक्तीचं आर्थिक शिक्षण हे फार दुय्यम दर्ज्याचे होते आणि त्याच मुळे या आर्थिक शिक्षणाच्या जोरावर त्यांनी त्यांच्या पद्धतीने पैशाचे नियोजन करायला सुरुवात केली होती.

एक मध्यमवर्गीय व्यक्ती त्याच्या आयुष्यामध्ये पैशाविषयीचे निर्णय त्याच्या मित्र परिवाराला, त्याच्या सहकार्यांना, आणि आई-वडिलांना त्याचबरोबर मीडियाला पाहून घेऊ लागला.

पण याच्या अगदी उलट एक श्रीमंत व्यक्ती पैशाचे सर्व निर्णय एका अनुभवी गुंतवणूकदार, स्व कर्तृत्वावर श्रीमंत झालेल्या व्यक्तीला, एका श्रीमंत आर्थिक सल्लागार किंवा श्रीमंत व्यापारी यांच्या सल्ल्यानुसारच घेतात.

बऱ्याच व्यक्ती आर्थिक संकटा मध्ये सतत दिसतात, याचे प्रमुख कारण त्यांचे उत्पन्न कमी आहे म्हणून नाही, बऱ्याच व्यक्ती आर्थिक संकटामध्ये दिसण्यामागचे प्रमुख कारण त्यांची पैश्या विषयीची नकारात्मक मानसिकता, आर्थिक नियोजनाचे अपुरे ज्ञान, योग्य

प्रकारच्या मालमत्तेमध्ये गुंतवणूक न करण्याची मानसिकता आहे.

त्यामुळे भारतामध्ये श्रीमंत असलेल्या लोकांचे प्रमाण फक्त एक टक्का आहे. जर तुम्ही श्रीमंत लोकांची संज्ञा काय आहे हे जाणून घेतलं, तर तुम्हाला याचे अजून सखोल ज्ञान मिळेल. जर तुमच्याजवळ 70 लाखापेक्षा जास्त गुंतवणूक मालमत्ता असेल तर तुम्ही श्रीमंत आहात असे म्हटले जाते. या 70 लाखांमध्ये गुंतवणूक केलेल्या मालमत्ता फक्त गृहीत केल्या जातात. उदाहरणार्थ तुम्ही शेअर मार्केट, म्युचल फंड मध्ये, बँकेचे फिक्स डिपॉझिट, कॉर्पोरेट बॉन्ड या प्रकारच्या मालमत्तेमध्ये गुंतवणूक करून तुमची मालमत्ता निर्मिती केली असेल, तरच तुम्ही श्रीमंत आहात असे गृहीत केले जाते. भारतामध्ये फक्त असे एक टक्का श्रीमंत लोक आहेत. श्रीमंत लोक ट्रॅडिशनल पद्धतीने आधी त्यांची मालमत्ता निर्मिती करतात, आणि त्यानंतर रिअल इस्टेट सारख्या मालमत्तेमध्ये गुंतवणूक करणे पसंत करतात.

भारतामध्ये बरेचशे व्यवसायिक उत्कृष्ट दर्ज्याचे व्यवसायिक आहेत, पण त्यापैकी फक्त एक टक्का व्यवसायिक उत्कृष्ट दर्जाचे व्यवसायिक आणि गुंतवणूकदार आहेत. याचे प्रमुख कारण आपल्या शिक्षण पद्धतीने आपल्याला आर्थिक साक्षरतेचे ज्ञान बिलकुल देखील दिले नाही. श्रीमंत होण्यासाठी एक विशिष्ट प्रकारची मानसिकता निर्माण करणे फार गरजेचे आहे.

सर्वात प्रथम तुम्हाला माहित असणे फार गरजेचे आहे की, तुम्ही उभे कुठे आहात आणि तुम्हाला जायचे कुठे आहे.

प्रत्येक व्यक्ती पैसे तर कमवतो, कमावलेल्या पैशाचे नियोजन करत नाही, कारण त्याच्या आयुष्यामधील कोणते आर्थिक ध्येय महत्त्वाचे आहे हेच त्या व्यक्तीला माहीत नसते.

समाजाला बघून ती व्यक्ती कोण कोणत्या गोष्टी साठी खर्च करायला पाहिजे हे ठरवायला सुरुवात करते.

आधुनिक शिक्षण पद्धतीने आपल्याला पैसे कमवण्यासाठी सक्षम बनवलेले आहे, पण कमावलेल्या पैशांचा योग्य पद्धतीने नियोजन कसे करायचे हे बिलकुल देखील शिकवलेले नाही.

प्रत्येक व्यक्तीचं पैश्याशी एक विशिष्ट नातं बनलेले आहे. बहुतांश लोकांना त्यांच्या गरजेपुरता पैसा कमावला म्हणजे आपण सुखी झालो असे नेहमी वाटत असते.

तुमच्या गरजेपुरता पैसा कमावलेल्या नंतर देखील पैशाचं आणि तुमचं नातं अधिक भक्कम होणे गरजेचे आहे. तुमच आणि पैशाचं नातं भक्कम करण्यासाठी तुम्हाला तुमची पैशाविषयीची मानसिकता बदलणे अत्यंत गरजेचे आहे.

एक मध्यम वर्गीय कुटुंब लहानपणापासून अन्न, वस्त्र, निवारा या तीन गोष्टींसाठी झगडत असतो. त्यामुळे त्यांच्या आयुष्याची उद्दिष्ट फक्त ही तीन झालेली आहेत. बऱ्याच व्यक्ती त्यांच्या आयुष्यामध्ये फक्त दोन गोष्टींसाठी झगडत असतात. त्या दोन गोष्टी म्हणजे सर्वात प्रथम दोन वेळेचे उत्तम जेवण आणि राहायला घर. जसजसे तुम्ही मोठे होता तुमचं उत्पन्न वाढायला सुरुवात होते तुम्ही या दोन गोष्टींवर जास्त प्रमाणे लक्ष केंद्रित करायला सुरुवात करता. तुमचे उत्पन्न वाढल्यावर तुम्ही चांगले राहणीमान बनवायला सुरुवात करता आणि चांगल्या राहणीमानामुळे तुमची घराविषयीची संकल्पना टप्प्याटप्प्यांनी बदलायला सुरुवात होते. तुमच्या कारकीर्दीची सुरुवात ज्यावेळेस होते त्यावेळेस तुम्ही वन बीएचकेच्या घरामध्ये राहण्यासाठी झगडायला सुरुवात करता. काही वर्षानंतर तुमचे उत्पन्न वाढल्यावर तुम्ही टू बीएचके आणि थ्री बीएचके अशा घरांमध्ये कशा पद्धतीने जाता येईल यासाठी झगडायला सुरुवात करता आणि अशा मानसिकतेमुळे मध्यमवर्गीय कुटुंब त्यांच्या उभ्या आयुष्यामध्ये कधी देखील श्रीमंत होऊ शकत नाही. त्यांना लहानपणापासून फक्त दोन गोष्टींसाठी झगडायला शिकवले आहे आणि

ते म्हणजे अन्न आणि निवारा.

लेखक नितीन घाडगे आणि धनश्री सगरे यांनी गेल्या बारा वर्षांमध्ये शेकडो मध्यमवर्गीय कुटुंबांना त्यांच्या मानसिकतेवर आणि आर्थिक कौशल्यांवर काम करून आर्थिक स्वातंत्र्य मिळवून दिले आहे.

अशी शेकडो कुटुंब त्यांच्याजवळ आहेत ज्यांनी शून्यापासून त्यांच्या आर्थिक जीवनाची कारकीर्द सुरु करून आज तीन कोटी पासून सात कोटी पर्यंत त्यांचे नेटवर्थ बनवले आहे.

त्यानी ती सर्व कौशल्य या पुस्तकांमध्ये खूप साध्या आणि सोप्या भाषेमध्ये दिलेली आहेत. वाचकांना विनंती आहे की ती समजून घेतल्यानंतर तुम्ही तुमच्या आर्थिक योजनकार आणि आर्थिक सल्लागारांचे मत घेणे देखील तितकेच जरुरीचे आहे.

पैसा हा तुमच्या आयुष्यामधील खूप महत्त्वाचा प्रकल्प (Project) आहे आणि कोणत्याही महत्त्वाच्या प्रकल्पावर काम करण्यासाठी तुमची मानसिकता आणि कौशल्य अत्यंत भक्कम असणे गरजेचे आहे.

रॉबर्ट कियोसाकी यांच्या **रिच डॅड अँड पुवर डॅड** या पुस्तकांमध्ये देखिल दिलेले आहे की नोकरी करणारी व्यक्ती त्याच्या आयुष्यामध्ये कधीच श्रीमंत होऊ शकत नाही. याचे प्रमुख कारण नोकरी करणारी व्यक्ती त्याच्या आयुष्यामध्ये श्रीमंत होण्यासाठी झगडत नाही. कारण लहानपणापासून त्यांच्या मेंदूची जडणघडण अशा पद्धतीने झाली आहे की श्रीमंत लोक खूप दुष्ट आणि कपटी असतात आणि गरीब लोक मनाने चांगले असतात. बिल गेट्स यांनी देखील सांगितले आहे की तुम्ही गरीब घरांमध्ये जन्म घेतला तर हा तुमचा प्रॉब्लेम नाही आहे पण तुम्ही गरीब म्हणून मेलात तर हा सर्वस्वी तुमचा प्रॉब्लेम आहे.

लेखकांनी या पुस्तकांमध्ये तुम्हाला श्रीमंत होणे का गरजेचे आहे, त्याचबरोबर श्रीमंत होण्यासाठी तुम्हाला योग्य मानसिकता कशी बनवायची, श्रीमंत होण्यासाठी तुमचे आर्थिक कौशल्य कसे वाढवायचे

हे सर्व सोप्या भाषेमध्ये दिलेले आहे.

तुम्हाला श्रीमंत लोकांची मानसिकता बनवण्याआधी चार Quadrants जाणून घेणे फार गरजेचे आहे.

1. नोकरी

तुम्ही नोकरी करून तुमच्या आयुष्यामध्ये श्रीमंत बिलकुल देखील होऊ शकत नाही. नोकरी करणारी व्यक्ती नेहमीच दिशाहीन आयुष्य जगत असते. ते कधी देखील त्यांच्या कामांमध्ये समाधानी नसतात. ते नेहमीच मी कंपनीला किती वेळ दिला हाच विचार करत असतात. ते कधीच हा विचार करत नाही की मी कंपनीला किती मूल्य दिले आहे ज्यामुळे कंपनीचा खूप मोठा फायदा झालेला आहे. म्हणून नोकरी करणाऱ्या व्यक्तीला वेळेचे स्वातंत्र्य बिलकुल देखील नसते. बऱ्याच नोकरदार व्यक्ती त्यांच्या उत्पन्नामध्ये देखील समाधानी नसतात. ज्यावेळेस त्यांचे उत्पन्न थांबते त्यावेळेस त्यांची वेळ देखील थांबते, अशा पद्धतीने त्यांची मानसिकता झालेली असते. 95 टक्के नोकरदार वर्ग फक्त एकाच उत्पन्नावर अवलंबून असतो. तुम्ही जर या Quadrants मध्ये असाल आणि तुम्ही तुमच्या पैशाचे नियोजन अजून देखील केलं नसेल तर त्वरित यावरती क्रिया करायला सुरुवात करा. सर्वात प्रथम तुमची आर्थिक साक्षरता हळूहळू वाढवणे सुरु करा. त्यासाठी तुम्ही आर्थिक नियोजनाचे वर्कशॉप, पैसा आणि पैशा विषयीची मानसिकता कशी बदलावी या प्रकारची पुस्तके वाचायला सुरुवात करा. जेणेकरून तुम्हाला पैशाविषयी तुमचे नाते अजून भक्कम करण्यास मदत होईल.

2. स्वयंरोजगार किंवा उद्योजक

नोकरीमध्ये इतके कष्ट करण्यापेक्षा स्वतःसाठी काम केलेलं कधीही चांगलं या मानसिकतेने लाखो स्वयंरोजगार आणि उद्योजकांचा जन्म

व्हायला सुरुवात होते. यामधील 10 टक्के उद्योजक यशस्वी होतात आणि उरलेले 90 टक्के अयशस्वी होतात. एक चांगला नोकरदार या विचाराने उद्योजक बनण्याचा प्रयत्न करतो की मी जितका वेळ मी माझ्या कंपनीसाठी दिला तितकाच वेळ मी आता माझ्या उद्योगासाठी देईन. पण तो ही गोष्ट विसरतो त्यांनी जी चूक नोकरीमध्ये केलेली आहे ती चूक उद्योगांमध्ये देखील करत असतो, आणि ती म्हणजे नोकरी करीत असताना त्याच्या दिवसभरामध्ये किती मूल्य असलेली काम करतो हे नेहमीच विसरत असतो आणि उद्योग करताना देखील त्याच्या कामाच्या मूल्यांकनाला दुय्यम दर्जा देतो. त्यामुळे बरेचशे छोटे उद्योजक हे नेहमीच नोकरदार मानसिकतेने उद्योग करत असतात. जसे नोकरदार वर्गाला वेळेचे स्वातंत्र्य बिलकुल नसते तसेच बऱ्याच छोट्या उद्योजकांना वेळेचे आणि पैशाचे स्वातंत्र्य बिलकुल मिळत नाही. ते नेहमीच या दोन गोष्टींसाठी झगडत असतात, त्यामुळे असे छोटे उद्योजक ग्राहकांच्या आयुष्यामध्ये फार मोठे मूल्य देऊ शकत नाही. या वर्गांमधील छोटे उद्योजक त्यांच्या केलेल्या कामाचा मोबदला ग्राहकाकडून मागताना नेहमीच लाजिरवाणे होत असतात. त्यामुळेच ते त्यांच्या उद्योगाला पुढच्या टप्प्यामध्ये घेऊन जाण्यासाठी नेहमीच अयशस्वी होतात.

3. उत्तम व्यावसायिक

या वर्गांमधील व्यावसायिक नेहमीच व्यवसाय मधील आवड आणि व्यवसाय मधील उद्देश डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करत असतो. आपल्या व्यवसायामध्ये नेहमीच उच्च पातळीची पूर्तता करण्यासाठी हा व्यावसायिक झगडत असतो. तो नेहमीच त्याच्या ग्राहकांच्या आयुष्यामध्ये उच्च दर्जाचे मूल्यांकन करण्यासाठी तत्पर असतो. त्यामुळे एक उत्तम व्यावसायिकाच्या वेळेला देखील खूप मूल्य असते. एक उत्तम व्यावसायिकाला वेळेचे आणि पैशाचे स्वातंत्र्य नेहमीच

अनुभवायला मिळते. एक यशस्वी व्यावसायिक नेहमीच यश आणि त्याच्या उद्योगांमधील वृद्धी यासाठीच काम करत असतो. तो नेहमीच मोठा उद्दिष्ट आणि ध्येय डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करत असतो. उत्तम व्यावसायिक नेहमीच महसूल आणि नफा (Revenue and Profit) यासाठी काम करत असतो. बरेच व्यावसायिक त्यांच्या व्यवसायामध्ये यशस्वी असतात पण वैयक्तिक वित्तीय घडामोडींकडे त्यांचे दुर्लक्ष असते. त्यामुळे ते उत्तम व्यावसायिक असतात पण उत्तम गुंतवणूकदार कधी बनू शकत नाही.

4. व्यावसायिक आणि गुंतवणूकदार

या श्रेणी मधील व्यावसायिक त्यांचा व्यवसाय आणि त्यांचे ध्येय यांना एकत्रित करून त्यांचे उद्दिष्ट साध्य करत असतात. त्यांचे विचार आणि संकल्पना यांची देवाणघेवाण करून त्यांना पैशाचा मोठा मोबदला मिळतो. त्यांच्याजवळ वेळेचे आणि पैशाचे खूप मोठे स्वातंत्र्य असते. त्यांना त्यांच्या संपत्ती निर्मितीचे मूल्यांकन योग्य पद्धतीने करता येते. म्हणून नेहमीच संपत्ती निर्मितीच्या मूल्यांकनाला ते आदर देत असतात. त्यामुळे ते एक उत्तम व्यावसायिक तर असतातच पण एक उत्तम गुंतवणूकदार देखील असतात. ते नेहमीच त्यांच्या विचाराने खूप मोठ्या समुदया वरती प्रभाव पाडत असतो. हा समुदाय देखील त्यांची खूप मोठी संपत्ती असते. बऱ्याच व्यक्तींना संपत्ती म्हणजे पैसा हेच समीकरण माहित आहे. पण या श्रेणी मधील लोकांसाठी संपत्ती म्हणजे त्यांचं आरोग्य, संपत्ती म्हणजे अध्यात्म, संपत्ती म्हणजे मनाची शांतता, संपत्ती म्हणजे आयुष्यामध्ये योग्य तत्त्वांवर चालणारी मुले आणि परिवार, संपत्ती म्हणजे मोठ्या समुदायामध्ये प्रभाव पाडणे.

जर तुम्हाला तुमच्या आयुष्यामध्ये श्रीमंत व्हायचे असेल तर या चार Quadrants ला जाणून घेणे फार महत्त्वाचे आहे.

जर तुम्हाला खूप मोठी संपत्ती निर्मिती करायची असेल तर तुम्हाला श्रीमंत लोकांचे मानसशास्त्र, श्रीमंत लोकांची धारणा, श्रीमंत लोकांची कृती नव्याने शिकावी लागेल.

या पुस्तकांमध्ये लेखकांनी श्रीमंत लोकांची मानसिकता आणि श्रीमंत लोकांचे आर्थिक कौशल्य कशा पद्धतीने विकसित असते हे सोप्या पद्धतीने समजावले आहे.

Lesson # 2

दीर्घ-कालीन संपत्ती निर्मितीचा क्रम

प्रत्येक व्यक्तीला त्याच्या आयुष्यामध्ये श्रीमंत होण्याची इच्छा असते, पण श्रीमंत होण्यासाठी एक विशिष्ट प्रकारची मानसिकता लागते, ती मानसिकता बऱ्याच जणांकडे नसते. प्रत्येक व्यक्तीचा आयुष्यामध्ये पैशाकडे बघण्याचा दृष्टिकोन पूर्णपणे वेगळा असतो. अध्यात्मिक दृष्ट्या जर आपण पैशाची संज्ञा बघितली तर पैसा म्हणजे एक प्रकारची पवित्र ऊर्जा आहे. पैशाची ही ऊर्जा जितकी योग्य प्रवाहामध्ये असते, तितकीच ती जास्तीत जास्त पैसा आकर्षित करते.

तुमच्या आयुष्यामध्ये तुम्हाला आर्थिक विपुलता मिळवायची असेल तर खालील तीन तत्वे तुम्हाला माहित असणे फार गरजेचे आहे.

1. पैशाविषयी एक विपुल मानसिकता तयार करणे.

2. श्रीमंत होण्यासाठी लागणारी सर्व आर्थिक कौशल्य शिकणे.

3. पैशाला आणि संपत्तीला जाणीवपूर्वक मूल्य देणे.

वरील तीन तत्त्वांना समजून न घेता, जर तुम्ही पैशाला हाताळत आहात म्हणजे पैशाविषयी तुम्हाला योग्य मूल्य नाही. जर तुम्हाला श्रीमंत व्हायचे आहे, जर तुम्हाला आर्थिक स्वातंत्र्य मिळवायचे आहे, जर तुम्हाला संपत्ती निर्माण करायची आहे तर तुम्हाला ही संपत्ती निर्माण करण्याचे मानसशास्त्र समजून घ्यावे लागेल.

श्रीमंत प्रत्येकाला व्हायचे आहे पण कधी आपण स्वतःला खालील प्रश्न विचारले आहेत का?

1. तुमची सध्याची मानसिकता आणि धारणा खरंच तुम्हाला श्रीमंतीकडे घेऊन जाऊ शकते का?
2. तुम्ही खरंच संपत्ती निर्मितीला महत्त्व देता का?
3. तुमची स्वतःची प्रतिमा संपत्ती निर्मितीसाठी बनली आहे का?

वरील तिन्ही प्रश्नांची उत्तरे नकारात्मक असतील याचा अर्थ तुम्हाला, तुमचे आर्थिक ज्ञान आणि आर्थिक कौशल्य वाढवणे फार गरजेचे आहे.

बऱ्याच व्यक्तींच्या मनामध्ये श्रीमंत व्यक्तीचा राग असतो. अशा तत्वाने जर तुम्ही पैसे कमवत असाल तर श्रीमंत होणे तुम्हाला फार कठीण होईल.

तुम्हाला तुमच्या आर्थिक जीवनामध्ये आर्थिक सक्षम आणि आर्थिक सुबत्ता मिळवायची असेल तर तुम्हाला आर्थिक स्वातंत्र्याच्या मूलभूत पायऱ्या माहित असणे फार गरजेचे आहे.

या मूलभूत पायऱ्या खाली दिलेल्या आहेत.

1. आर्थिक स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रवास तुम्ही जितक्या लवकर सुरु कराल तितके तुमच्यासाठी चांगले आहे.
2. जोपर्यंत तुमच्या परिवाराचे उत्पन्न सुरक्षित करत नाही तोपर्यंत गुंतवणूक करु नका.
3. भविष्यामध्ये होणाऱ्या नेटवर्थची गणना कशी करायची ते शिका.

जोपर्यंत तुम्ही या मूलभूत पायऱ्यांवर काम करीत नाही तोपर्यंत आर्थिक स्वातंत्र्य मिळवणे तुमच्या साठी एक कठीण प्रवास असेल.

पण जर तुम्हाला दीर्घकालीन संपत्ती आणि आर्थिक स्वातंत्र्य

मिळवायचे असेल तर तुम्हाला ही तत्वे आणि सूत्र शिकण्या शिवाय कोणताच पर्याय उपलब्ध नाही.

या लेखामध्ये तुम्हाला दीर्घकालीन संपत्ती निर्मिती करण्यासाठी कोणत्या क्रमानुसार जावे लागेल हे लेखकाने सांगितले आहे. पुढील दहा वर्षांमध्ये जर तुम्हाला आर्थिक स्वातंत्र्य मिळवायचे असेल तर खाली दिलेल्या सहा सूत्रांना काटेकोरपणे पाळावे लागेल. ही मूलभूत सूत्रे दिलेल्या क्रमानुसार तुम्हाला वापरावी लागतील.

1. तुमचे व्यावसायिक आणि उच्च उत्पन्न निर्माण करण्याचे कौशल्य सतत वाढवावे लागेल.

तुमच्यापैकी काही जण नोकरी करत असतील, काही जण उद्योजक असतील, काहीजण विभिन्न व्यवसायांमध्ये असतील. पण त्यापैकी 95 टक्के लोकांच्या आयुष्यामध्ये एक गोष्ट सामान्य असेल आणि ती म्हणजे 95 टक्के लोक एकाच उत्पन्नांवर अवलंबून असतील.

एक मध्यमवर्गीय मानसिकतेची व्यक्ती त्याच्या आयुष्यामध्ये तीस ते पस्तीस वर्ष एकाच उत्पन्नावर अवलंबून असते. पण या उलट एक श्रीमंत व्यक्ती त्याच्या सक्रिय उत्पन्नावर पाच ते दहा वर्ष अवलंबून असते पण त्याच दरम्यान पाच ते दहा भिन्न ठिकाणाहून उत्पन्न निर्माण कसे करता येईल याचा विचार करत असते. तुम्हाला या गोष्टीचा सतत विचार करायचा आहे की ज्या उद्योग वर्गामध्ये तुम्ही काम करत आहात तेथे तुमच्या उत्पन्नाची वृद्धी होते की नाही, जर तुमच्या उत्पन्नामध्ये 20 टक्क्याने दरवर्षी वाढ होत नसेल तर याचा अर्थ तुमच्याजवळ उच्च उत्पन्न निर्माण करण्याचे कौशल्य नसेल. या कौशल्यांमध्ये तुम्हाला आर्थिक व्यवस्थापन आणि गुंतवणूक करण्याचे कौशल्य सर्वात प्रथम शिकावे लागेल. जर तुम्ही ही दोन्ही कौशल्य शिकण्यासाठी वेळेचे कारण पुढे करत असाल तर त्याचा देखील फक्त एकच अर्थ होतो आणि

तो म्हणजे तुम्ही तुमच्या पैशाला दुय्यम दर्जाचे मूल्य दिले आहे. ज्या वेळेस तुम्ही तुमच्या व्यावसायिक कौशल्यांवर काम करता त्यावेळेस पैशाचे मूल्यांकन योग्य पद्धतीने करायला शिकता.

2. तुमच्या उत्पन्नाला दर वर्षी 20 ते 50 टक्क्यांनी वाढवण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

बऱ्याच व्यक्तींचे उत्पन्न फारच कमी असते आणि त्यामुळे पैशाचे नियोजन करणे त्यांच्यासाठी फारच कठीण होऊन बसते. अशा व्यक्तींची पैशाची मानसिकता फारच नकारात्मक असते. प्रत्येक व्यक्तींनी त्याच्या कौशल्यांवर सतत काम करणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरून या कौशल्यांच्या जोरावर त्यांचे उत्पन्न सतत वाढत राहील. जर तुम्हाला पुढील दहा वर्षांमध्ये आर्थिक स्वातंत्र्य मिळवायचे असेल तर तुमचे उत्पन्न दरवर्षी वाढणे फार बंधनकारक आहे. तुम्ही तुमच्या पैशाचे योग्य पद्धतीने व्यवस्थापन केल्याने, तुमच्या वाढलेल्या उत्पन्नाचा योग्य पद्धतीने गुंतवणूक करण्यासाठी वापर करू शकता.

3. दर महिन्याला 15 ते 25 टक्क्यांची बचत करणे

तुम्ही किती पैसे कमविता हे फारसे महत्त्वाचे नाही पण कमावलेल्या पैशाचे योग्य पद्धतीने आर्थिक व्यवस्थापन करता की नाही हे अत्यंत महत्त्वाचे आहे. जे काही तुमचे महिन्याचे उत्पन्न आहे त्या उत्पन्नाच्या ठराविक भाग बचत करायला लागेल. सुरुवातीच्या काळामध्ये जेव्हा तुमचे उत्पन्न कमी असेल त्या वेळेपासून ही सवय लागणे अत्यंत गरजेचे आहे. बऱ्याच व्यक्तींना वाटते की आपले उत्पन्न वाढल्यानंतर आपण जास्तीत जास्त बचत करायला सुरुवात करू. पण ज्यावेळेस तुमचे उत्पन्न वाढते त्यावेळेस तुमच्या इतर जबाबदाऱ्या आणि गरजा देखील वाढायला सुरुवात होतात. तुमचे उत्पन्न किती असले तरी देखील

सुरुवातीपासून तुम्हाला ही सवय लागणे अत्यंत गरजेचे आहे. एक उत्तम गुंतवणूकदाराची सुरुवात त्याच्या चांगल्या बचतीने होते. तुम्ही जितकी बचत जास्त कराल तितका गुंतवणूकीसाठी तुमच्याजवळ पैसा शिल्लक राहील.

4. परिवाराच्या भविष्याच्या उत्पन्नाला संरक्षित करणे -

आज जर तुमच्या एकमेव उत्पन्ना वरती तुमचे परिवार अवलंबून आहे, तर या उत्पन्नाला तुम्हाला संरक्षित करणे अत्यंत गरजेचे आहे. जर तुमच्यावर परिवाराच्या खूप मोठ्या जबाबदाऱ्या असतील, तर थोडा वेळा विचार करा, जर मला काही झाले तर या जबाबदाऱ्या कोण पूर्ण करेल. उदाहरणार्थ: एका परिवारा मधील मुख्य व्यक्तीचे जर निधन झाले तर त्याच्या पश्चात त्यांच्या मुलांच्या वर्तमान काळातील आणि भविष्य काळातील शिक्षणासाठी लागणारा खर्च आणि मुलांच्या भविष्यात लग्नासाठी लागणाऱ्या खर्चाची तरतूद करणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचबरोबर तुमचा जोडीदार तुमच्या वरती आर्थिक दृष्ट्या अवलंबून असेल, तर तुमच्या पश्चात त्यांच्या उत्पन्नाची तरतूद करणे देखील अत्यंत गरजेचे आहे.

हल्लीच्या जीवनशैलीमध्ये जर आपण पाहिलं तर लोकांच्या झोपण्याच्या आणि खाण्यापिण्याच्या वेळा बदलत चाललेल्या आहे. त्याचबरोबर खाण्यापिण्याच्या सवयी देखील बदलत गेलेल्या आहेत. याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावरती होतो आहे. त्यांची रोगप्रतिकार शक्ती कमी होत चालली आहे आणि ज्या वेळेस रोग प्रतिकार शक्ती कमी होते त्यावेळेस आजारपणाचं चक्र तुमच्या पाठी सुरू व्हायला लागते. अशावेळी तुमच्या जवळ तुमच्या संपूर्ण परिवाराचा एक आरोग्य विमा असणे अत्यंत गरजेचे आहे.

त्याचबरोबर घरांमधील प्रमुख व्यक्तीचा आकस्मिक अपघात झाला

आणि त्याला अपंगत्व आले, तर त्या व्यक्तीचे उत्पन्न संपूर्णपणे थांबून जाईल. अशा काही आज आकस्मिक घटनेसाठी सर्व सामान्य विचारांची व्यक्ती कधीच तरतूद करत नाही. त्यासाठी तुमच्याजवळ एक अपघात विमा असणे गरजेचे आहे.

हल्लीच्या काळामध्ये उत्पन्नामध्ये सातत्य ठेवणे अत्यंत कठिण बाब झालेली आहे. आज भारतामध्ये कोरोना नंतर बऱ्याच गोष्टींमध्ये बदल पाहायला मिळालेला आहे. याचा परिणाम बऱ्याच व्यक्तींच्या उत्पन्नावरती पडलेला आहे. कोरोना मध्ये बऱ्याच व्यक्तींची नोकरी देखील गेलेली आहे, बऱ्याच व्यक्तींचे उत्पन्न कमी झालेले आहे, त्याचबरोबर कित्येक उद्योग धंदे बंद देखील पडलेले आहेत. त्यापैकी बऱ्याच व्यक्तींनी आपत्कालीन निधीची तरतूद न केल्याने त्यांच्या आर्थिक जीवनामध्ये खूप मोठी अडचण आलेली आहे. बऱ्याच व्यक्तींना आपत्कालीन निधीचे महत्त्वच कळत नाही. अशा प्रकारची परिस्थिती जर तुमच्या आयुष्यात कधी आली असेल तर तुम्हाला देखील त्याचा अनुभव आला असेल. तुमच्या महिन्याच्या खर्चाच्या किमान सहा पट तरी आपत्कालीन निधी तुमच्या जवळ असणे गरजेचे आहे. तुम्हाला दीर्घकालीन संपत्ती निर्माण करायची असेल तर त्याचे काटेकोरपणे पालन करणे अत्यंत गरजेचे आहे. कोणत्याच प्रकारची गुंतवणूक आपत्कालीन निधी बनविल्या शिवाय करू नका. आज जर तुम्हाला कोणत्याही प्रकारच्या मालमत्ते मधून संपत्ती निर्माण करायची असेल तर तुमचा आपत्कालीन निधी तुमच्या जवळ असणे बंधनकारक आहे.

5. योग्य प्रकारचा गुंतवणूक पर्याय निवडणे.

आज भारत जगामधील कोणत्याही तज्ञाचा सल्ला न घेता, स्वतःच्या अपुऱ्या ज्ञानाने गुंतवणूक करण्यामधील पहिल्या क्रमांकाचा देश झाला आहे. ही अत्यंत वाईट बातमी आहे जेथे बऱ्याच व्यक्ती त्यांच्या

अति आत्मविश्वासी स्वभावामुळे शेअर मार्केट मध्ये गुंतवणूक करून स्वतःची फसवणूक करत आहे. गुंतवणुकीची काही मूलभूत तत्व आणि सूत्र न शिकता गुंतवणूक करणे अत्यंत घातक आहे. 95 टक्के लोक त्यांच्याजवळ कोणत्याच प्रकारचे आर्थिक कौशल्य आणि श्रीमंत होण्याची मानसिकता नसताना देखील गुंतवणूक करतात. गुंतवणूक करण्यापूर्वी तुम्हाला गुंतवणुकीची काही मूलभूत तत्त्वे शिकणे अत्यंत गरजेचे आहे. लेखकाने ती सर्व मूलभूत तत्त्वे आणि सूत्र या पुस्तकां मध्ये दिलेली आहे. वाचकांना लेखकाचे आवाहन आहे की जर तुम्ही ही मूलभूत तत्वे आणि सूत्र यांची अंमलबजावणी न करता गुंतवणूक केली तर तुम्ही नक्कीच आर्थिक संकटांमध्ये येऊ शकता.

कोणतीही गुंतवणूक करण्यापूर्वी तुमच्याजवळ त्यासाठी भक्कम उद्देश असणे अत्यंत गरजेचे आहे. 95 टक्के व्यक्ती कोणत्याही प्रकारचे आर्थिक उद्देश्य डोळ्यासमोर न ठेवून गुंतवणूक करायला सुरुवात करतात. त्यामुळे दीर्घकालीन संपत्ती निर्माण करणे त्यांच्यासाठी खूप मोठी आणि न पेलणारी जबाबदारी होऊन बसते.

येथे गुंतवणूक करण्यापूर्वी तुम्हाला आर्थिक ध्येय कसे ठरवावे हे शिकणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी तुम्हाला एका चांगल्या आर्थिक नियोजनकराची मदत घेणे अत्यंत गरजेचे आहे. तो तुम्हाला तुमचे आर्थिक ध्येय निवडण्यासाठी मदत करेल. आर्थिक योजना कशी बनवायची असते हेदेखील शिकावे लागेल. ज्यावेळेस तुमच्या जवळ तुमचा फायनान्शियल प्लान असतो त्यावेळेस गुंतवणूक करणे अत्यंत सोपे जाते.

तुम्हाला जर गुंतवणूक करून श्रीमंत व्हायचे असेल तर, तुमच्याजवळ एक उत्तम फायनान्शिअल प्लान असणे अत्यंत बंधनकारक आहे. एक उत्तम फायनान्शियल प्लान तुमच्या गुंतवणुकी मध्ये वचनबद्धता, शिस्त आणि सातत्य आणण्यास तुम्हाला मदत करू शकतो. वाचकांनी ही

गोष्ट लक्षात ठेवावी, जर तुमच्याजवळ फायनान्शियल प्लान नसेल तर गुंतवणूक करण्याची जोखीम बिलकुल देखील घेऊ नका.

6 मालमत्तेचे संरक्षण करून योग्य पद्धतीने हस्तांतरण करणे.

तुमच्याजवळ असलेल्या संपत्ती मध्ये वाढ करून तिचा उपभोग घेऊन ही संपत्ती तुमच्या पुढच्या पिढीला योग्य प्रकारचे आर्थिक शिक्षण देऊन त्यांच्या जवळ हस्तांतरण करणे हे तुमचे कर्तव्य आहे. एक मध्यमवर्गीय व्यक्ती त्याच्या उभ्या आयुष्यामध्ये गुंतवणूक करून संपत्ती निर्मिती करतो. पण ज्याला त्यांनी संपत्ती निर्मिती केल्याचं नाव दिलं आहे ही खरंच संपत्ती निर्मिती आहे का? हा नेहमीच प्रश्न पडत असतो. आज निवृत्त झालेल्या प्रत्येक व्यक्तीकडे साधारण एक ते दोन घरे असतात. त्याचबरोबर त्यांच्याकडे काही प्रमाणामध्ये फिक्स डिपॉझिट, पब्लिक प्रोविडेंट फंड, पोस्ट मधील सीनियर सिटीजन स्कीम, थोड्या प्रमाणामध्ये म्युचल फंड आणि शेअर मार्केट मध्ये पैसे गुंतविलेले असतात. इतकी संपत्ती निर्मिती करून देखील पालक वर्ग त्यांच्या मुलांना त्यांच्याजवळ किती संपत्ती आहे याची जाणीव करून देत नाही. याला सर्वात प्रथम पालक वर्ग जबाबदार आहे. त्याचबरोबर त्यांची मुलं उच्च शिक्षण घेऊन देखील त्यांच्या आईवडिलांच्या आर्थिक जीवनामध्ये बिलकुल देखील लक्ष घालत नाही. याचे प्रमुख कारण दोन्ही पिढ्यांना पैशाविषयीचे नातं कधीच समजले नसते. पालक वर्गांना बिलकुल देखील आत्मविश्वास नसतो की त्यांची मुले या संपत्तीचे संरक्षण करून त्या संपत्तीची वृद्धी देखील करतील. आपल्या शिक्षण पद्धतीमध्ये पैशाविषयी नाते कसे असले पाहिजे, पैसा हा आपल्या आयुष्यामध्ये एक महत्त्वाचा प्रकल्प आहे, पैशाचे नियोजन शास्त्र शुद्ध पद्धतीने कसे झाले पाहिजे हे बिलकुल देखील शिकवले गेले नाही. त्यामुळे पिढ्यान पिढ्या उलटून देखील एकही पिढी श्रीमंत होत नाही. आज प्रत्येक घरांमध्ये आई-वडिलांची

संपत्ती किती आहे याचे साधे ज्ञान देखील नाही.

त्यामुळे आई-वडिलांच्या निधनानंतर संपत्ती वाटपासाठी कोर्टकचेरीच्या फेऱ्या माराव्या लागतात. त्यामुळे एक पिढी श्रीमंत असेल तर त्याच्या दुसऱ्या पिढीला आर्थिक विवंचने मध्ये उभे आयुष्य काढावे लागते. एका मध्यमवर्गीय कुटुंबातील प्रमुखाचे पैसा आणि संपत्ती विषयीचे ज्ञान अपुरे असल्या कारणाने, तो या दोन्ही गोष्टींना कधीच प्राधान्य आणि महत्व देत नाही. आणि त्यामुळे त्यांची बिलकुल देखील इच्छा नसते की आपली जी काही संपत्ती आपण बनवली आहे, ती पिढ्यानपिढ्या योग्य पद्धतीने हस्तांतरित होऊन त्या संपत्तीमध्ये खूप मोठी वाढ होणे गरजेचे आहे.

लेखक नितीन घाडगे आणि धनश्री सगरे यांच्या मार्गदर्शना खाली गेल्या बारा वर्षांमध्ये शेकडो कुटुंबाने शून्यापासून एक कोटी ते दहा कोटी पर्यंत संपत्ती निर्मिती केली आहे. त्यापैकी बऱ्याच कुटुंबातील पुढील पिढी साधारण दहा ते वीस वर्ष वयोगटातील आहे. त्यांच्या पुढील पिढीला आर्थिक नियोजन आणि गुंतवणुकीचे ज्ञान याच वयापासून दिले जाते.

येथे एक उदाहरण आम्ही देत आहोत. अमित एका मध्यमवर्गीय कुटुंबामध्ये राहत असून, तो मुंबईस्थित एका खाजगी कंपनी मध्ये नोकरी करत आहे. अमितचे वय 43 वर्षे आहे. अमित याला त्याच्या आई-वडिलांकडून बचतीची आवड लहानपणापासून लागली होती. अमित गेले नऊ वर्षापासून वेल्थ कोच नितीन घाडगे आणि फायनान्शिअल कोच धनश्री सगरे यांच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रशुद्ध आणि शिस्तबद्ध पद्धतीने आर्थिक नियोजन करत आहे. गेल्या नऊ वर्षांमध्ये अमितचे नेटवर्थ साधारण साडेतीन कोटी पर्यंत पोचले आहे. अमितला त्याचे नेटवर्थ दर वर्षी वीस टक्क्यांनी कसे वाढवायचे हे कौशल्य माहित आहे. अमित ची मुलगी आज दहा वर्षाची आहे. एक उत्तम गुंतवणूकदार आणि

एक सुजाण पालक म्हणून अमित आजपासून त्याच्या मुलीला पैशाचं महत्व, पैशाच नियोजन आणि संपत्ती वृद्धी चे महत्व देत आहे. अमित नेहमी पैशाची आणि संपत्तीची जाणीव त्याच्या मुलीला करून देत आहे. जेणेकरून अमित ची मुलगी अजून 33 वर्षांनी ज्यावेळेस अमितच्या वयाची होईल, त्यावेळेस साधारण 145 कोटीचे नेटवर्थ अमितच्या मुलीकडे असेल. त्यानंतर पुढील दहा वर्षानंतर हेच 145 कोटी साधारण 880 कोटी होतील. पण सर्वसाधारण मध्यमवर्गीय व्यक्ती बिलकुल देखील या पद्धतीने कधीच विचार करत नाही. अमित आज त्याच्या चांगल्या सवयी मुळे कोट्याधीश बनला आहे पण त्याला त्याची मुलगी अब्जाधीश बनावं अशी जर इच्छा असेल तर त्यांनी आज पासून त्याची मालमत्ता योग्य पद्धतीने तिच्या जवळ कशी हस्तांतरित करता येईल याची तरतूद करणे अत्यंत गरजेचे आहे.

त्यासाठी अमितने त्याचे इच्छापत्र बनवणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरुन त्याची संपत्ती सहजपणे त्याच्या मुलीच्या जवळ जाऊ शकते.

जर तुम्हाला मनापासून या जन्मी श्रीमंत व्हायचं असेल तर वरील दिलेल्या सहा स्टेप्स काटेकोरपणे पाळणे अत्यंत बंधनकारक आहे.

Lesson # 3

मानसशास्त्र पैश्याच्या नियोजनाचे

या लेखामध्ये आपण जाणून घेणार आहोत पैश्याच्या मानस शास्त्राचे महत्त्व **(Behavioural Finance)** तुमच्या आर्थिक नियोजनामध्ये किती प्रमाणात आहे? वर्तवणूक वित्त या प्रक्रियेमध्ये तुम्ही घेत असलेल्या आर्थिक निर्णयावरून तुमचे वर्तवणूक आणि तुमचे मानसशास्त्र कळण्यात येते. आर्थिक नियोजन करते वेळी सर्वात आवश्यक घटक म्हणजे तुमची निर्णय घेण्याची क्षमता. आर्थिक नियोजन करते वेळी आमचा बऱ्याच व्यक्तींशी संपर्क होतो. त्यामधील काही जणांना त्यांच्या निर्णय घेण्याच्या क्षमतेवर अतिप्रमाणात आत्मविश्वास असतो. त्यांच्या आर्थिक जीवनात त्यांनी बरेच चुकीचे निर्णय घेतले आहे हे दाखवून देखील ते कबूल करण्याचे धाडस त्यांच्यामध्ये नसते. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यामध्ये चढ-उतार, सुख-दुःख या प्रकारचे अनुभव वारंवार येत असतात यामधील काही अनुभव आपल्या अंतर्मनावर खोलवर बिंबवले जातात. पुढील वेळी त्या अनुभवा वरून आपण आपल्या निर्णय घेण्याची क्षमता तयार करतो. गुंतवणूक करते वेळी देखील बऱ्याच वेळा गुंतवणूकदारांना त्यांच्या मागील काही चुकीच्या निर्णयामुळे वाईट अनुभव आला असेल तर पुढील निर्णय घेते वेळी ते मागील अनुभवा वरून त्यांची मत तयार करतात.

कोणत्याही खेळांमध्ये तुम्हाला जर प्रावीण्य मिळवायचे असेल तर तुम्हाला 3 टप्प्या मधून जावे लागते. सर्वात प्रथम प्रशिक्षण, मग सराव आणि अंतिम टप्प्यामध्ये सामना किंवा स्पर्धा. स्पर्धेच्या तुलनेमध्ये प्रशिक्षण घेणे नेहमीच कंटाळवाणे असते. प्रशिक्षणा दरम्यान प्रत्येकाला

त्याच्या मूलभूत गोष्टींवर मेहनत करणे फार महत्त्वाचे असते. आता आपण तुम्ही केलेल्या गुंतवणुकी विषयी जर विचार केला तर प्रत्येक व्यक्तीला गुंतवणूक केल्यानंतर जास्तीत जास्त परतावा मिळण्याची अत्यंत घाई असते. पण तुम्ही कधी गुंतवणूक करतेवेळी त्या गुंतवणुकी मधील जोखीम आणि इतर बाबी शिकण्याचा कधी प्रयत्न केला आहे का? या गोष्टीचा तुम्हा सर्वांना नीट विचार करणे फार गरजेचे आहे.

दुसरा टप्पा म्हणजे सराव. जेथे तुम्ही तुमच्या मित्रांसोबत हरण्याचा ताण न घेता अत्यंत उत्कृष्ट पणे खेळण्याचा प्रयत्न करता. सरावादरम्यान कधी कधी तुम्हाला असे देखील वाटते कदाचित मी चुकीच्या व्यवसायामध्ये आहे, मी एक व्यावसायिक क्रिकेटपटू असायला हवे होते. गुंतवणूकदारांना देखील गुंतवणूक केल्यानंतर बऱ्याच वेळा असे वाटते की त्यांनी घेतलेले गुंतवणुकीचे निर्णय हे अत्यंत अचूक आहेत. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये आम्ही बऱ्याच व्यक्तींना गुंतवणुकीचे निर्णय कोणत्याच प्रकारचे प्रशिक्षण आणि सराव न घेता करताना पाहिले आहे. गुंतवणूक करताना बरेच गुंतवणूकदार गुगल या माध्यमाचा अति प्रमाणात वापर करून त्यांचे गुंतवणुकीचे निर्णय घेत असतात. गुंतवणूकदारांना ते निर्णय घेतल्यावर आपण देखील उत्तम गुंतवणूक सल्लागार होऊ शकतो असे वाटत असते.

अंतिम टप्प्यामध्ये ज्या वेळेस तुम्ही स्पर्धेमध्ये सहभाग घेता त्या वेळेस तुम्हाला एकही फटका अचूकरीत्या मारता येत नाही. तुम्ही विचार करायला लागता सरावा दरम्यान तुमच्या मित्रांनी भरभरून कौतुक केले ते सर्व फटके कोठे गायब झाले. सरावादरम्यान तुम्ही उत्कृष्ट खेळाडू होता कारण येथे तुम्हाला हरण्याचं ताण नव्हता, पण स्पर्धेदरम्यान तुम्हाला जिंकण्याचं आणि इतर लोक तुम्हाला पाहत असल्याचं ताण असतो. प्रत्येक फटका मारते वेळी तुम्ही अत्यंत खबरदारी घेत असतात.

तुम्ही म्हणाल वरील उदाहरणाचा गुंतवणुकीशी काय संबंध? आपण

वरील उदाहरणाची तुलना गुंतवणुकी मध्ये कशी होते आता पाहूया. बऱ्याच वेळा गुंतवणूकदार शेअर मार्केट संबंधित काही बेसिक कोर्सेस चे प्रशिक्षण घेऊन त्यावर त्यांच्या काही स्ट्रॅटेजी बनवतात. बनवलेल्या स्ट्रॅटेजी अंमलात आणण्यासाठी आता शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्याचे धाडस गुंतवणूकदार करतात. गुंतवणूक जगात 90% गुंतवणूकदार कोणत्याच प्रकारचे प्रशिक्षण किंवा सराव न करता थेट शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक करण्याचे धाडस करतात. त्यांचा असा समज असतो की थेट शेअर मार्केट मध्ये पैसे गुंतवल्या नंतरच आपल्याला काहीतरी शिकायला मिळेल.

आमच्या अनुभवावरून आम्हाला असे पाहण्यात आले आहे गुंतवणूकदारांचे मानसशास्त्र चार प्रकारांमध्ये मोडते.

1. अतिविचारी गुंतवणूकदार:

या प्रकारातील गुंतवणूकदार गुंतवणुकी नंतर होणाऱ्या परिणामाचा सतत विचार करीत असतो. हा गुंतवणूकदार वर्तमान काळात मिळणाऱ्या परताव्या कडे दुर्लक्ष करून भविष्यात मिळणाऱ्या परताव्या कडे अधिक लक्ष केंद्रित करत असतो. गुंतवणुकीमधील अनिश्चितता आणि जोखीम जाणून देखील गुंतवणुकीच्या योग्यतेनुसार निर्णय घेण्यास टाळाटाळ करतो. या प्रकारच्या गुंतवणूकदारांना जर तुम्ही सांगितले की विशिष्ट प्रकारच्या गुंतवणूक उत्पादनामध्ये 20% मुद्दल गमावण्याची शक्यता आहे पण 80% तुम्हाला या मालमत्तेमध्ये 12% परतावा मिळण्याची शक्यता आहे तर त्या गुंतवणूकदाराला असे वाटते की हे गुंतवणूक उत्पादन अत्यंत जोखमीचे आहे आणि तो 100% मुद्दल सुरक्षित असलेल्या गुंतवणूक उत्पादना विषयी चर्चा करू लागतो. त्याला गुंतवणूक उत्पादनांमधील जोखीम आणि अनिश्चितता सांगितल्यावर तो गुंतवणूक सल्लागारा कडे देखील संशयित नजरेने पाहायला लागतो.

2. पश्चाताप होऊ न देणारे गुंतवणूकदार:

या प्रकारच्या गुंतवणूकदाराला गुंतवणूक केल्यानंतर कोणत्याच प्रकारचा पश्चाताप व्हावा अशी बिलकुल इच्छा नसते म्हणून हे गुंतवणूकदार कोणत्याही प्रकारचे निर्णय घेत नाही. हे गुंतवणूकदार त्यांनी ठरवलेले ध्येय साध्य केल्यानंतर देखील त्यांच्याजवळ असलेले शेअर्स विकण्याचे धाडस करीत नाही. त्यांच्याजवळ असलेल्या शेअर्स किंमत प्रमाणापेक्षा खाली आली किंवा प्रमाणापेक्षा वर गेली तरीही ते शेअर्स विकण्याचे निर्णय घेत नाहीत.

3. वर्तमान काळात जगणारे गुंतवणूकदार:

या प्रकारातील गुंतवणूकदार वर्तमान काळात घडणाऱ्या घडामोडींवर अतिप्रमाणात लक्ष केंद्रित करतात. ते असा विचार करतात की सध्याच्या बाजार भावात मिळणारे गुंतवणूक उत्पादन हे योग्य दरात उपलब्ध आहे. या गुंतवणूकदारांचा खूप सारा वेळ आणि प्रयत्न हा सध्याच्या आकडेवारी, विश्लेषण आणि बाजाराचा कल या बाबींकडे लक्ष देण्यातच जातो. हे गुंतवणूकदार ऐतिहासिक (Historical) आणि मूलभूत तथ्य (Fundamental Facts) संपूर्णपणे दुर्लक्षित करतात. गुंतवणूक जगतात नवीन गुंतवणूकदाराची मानसिकता या प्रकारची असू शकते. जेव्हा एक गुंतवणूकदार नवीन गुंतवणूक उत्पादनांमध्ये ज्यावेळेस गुंतवणूक करतो आणि या गुंतवणुकीविषयी त्याच्याजवळ अधिक माहिती उपलब्ध नसते त्यावेळेसच या प्रकारची मानसिकता पहावयास मिळते.

4. अति आत्मविश्वास असणारे गुंतवणूकदार:

या प्रकारातील गुंतवणूकदार अति आत्मविश्वासी किंवा अनिश्चित निर्णय घेणारा असतो. त्याला त्याच्या प्रतिभेवर अतिशयोक्ती

असल्याकारणाने तो इतर बाबींकडे दुर्लक्ष करतो, ज्या भविष्यामध्ये त्याला खूप महागात पडू शकतात. अति आत्मविश्वासी गुंतवणूकदार असे दाखवतो की गुंतवणूक जगतातील सर्व माहिती त्याला आधीपासूनच माहित आहे आणि या माहितीच्या आधारावर तो त्याचे निर्णय घेत असतो. हा गुंतवणूकदार त्याच्या या स्वभावामुळे त्याला मार्गदर्शन करणाऱ्या गुंतवणूक किंवा आर्थिक सल्लागाराला भेटण्यास देखील तयार नसतो.

गुंतवणूकदारांच्या वरील गुणधर्मांमुळे खालील काही चुका होण्याची शक्यता असते.

1. भविष्यात जे नुकसान होणार नाही त्याचा अतिप्रमाणात विचार करत राहणे.
2. एक यशस्वी गुंतवणूकदार होण्यासाठी खूप सारं ज्ञान असण्याची गरज आहे अशी समजूत बनवणे.
3. गुंतवणुकीचा कालावधी न ठरवता गुंतवणूक करण्याची वृत्ती तयार होते.
4. आर्थिक ध्येय न ओळखता गुंतवणूक उत्पादन खरेदी करण्याची प्रवृत्ती तयार होते.
5. टप्प्या टप्प्याने आपले गुंतवणुकीचे निर्णय आणि गुंतवणूक उत्पादनात सतत बदल करत राहिल्याने आपले आर्थिक ध्येय सहज साध्य करता येऊ शकते असा समज अंगी जोपासणे.

गुंतवणूकदारांचे मानसशास्त्र ओळखल्यानंतर आम्ही त्यांचे सात प्रमुख प्रकारांमध्ये वर्गीकरण केले.

1. फक्त बचत करणारे गुंतवणूकदार

भारतामध्ये जास्तीत जास्त गुंतवणूकदार या प्रकारांमध्ये मोडतो. ज्यावेळेस त्यांना इक्विटी या गुंतवणूक मालमत्ता वर्गाविषयी ज्ञान देण्याचा प्रयत्न केला जातो त्यावेळेस त्यांना हा विषय पृथ्वीच्या बाहेरचा आहे असे वाटू लागते. त्यांच्या एकूण मालमत्तेमधील आणि उत्पन्ना मधील एक रुपयाही ते इक्विटी मालमत्ता वर्गामध्ये गुंतवणूक करण्यास तयार नसतात. त्यांचे ठाम मत झाले असते की, इक्विटी हा मालमत्ता वर्ग गुंतवणुकीसाठी अत्यंत जोखमीचा आहे आणि यापासून लांब राहणे हेच शहाणपण आहे. त्यांच्या बचतीमधून जो काही व्याजदर त्यांना मिळत आहे त्यामध्ये ते अत्यंत आनंदी असतात. गुंतवणूक करताना जोखीम घेणे नेहमीच महागात पडू शकतं असा त्यांचा ठाम विश्वास झालेला असतो.

2. नियमित गुंतवणूक करणारे गुंतवणूकदार

अत्यंत दुर्लभ असलेली ही गुंतवणूकदारांची प्रजाती आपणास पहावयास मिळेल. त्यांच्या दृष्टीने इक्विटी हा मालमत्ता वर्ग दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी योग्य मालमत्ता वर्ग आहे. शेअर बाजारांमध्ये घडणाऱ्या छोट्या छोट्या घडामोडींवर भाष्य करणं ते सतत टाळत असतात. हा गुंतवणूकदार वर्ग त्यांच्याजवळ अतिरिक्त रक्कम असेल तर गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतो आणि ज्या वेळेस त्यांना पैशाची गरज असेल त्यावेळेस गुंतवणूक केलेल्या रकमेचा काही भाग काढून घेण्याची तयारी देखील दर्शवितो. त्यांचा असा ठाम विश्वास असतो की इक्वीटी हा मालमत्ता वर्ग दीर्घकाळात इतर कोणत्याही मालमत्ता वर्गामध्ये मिळणाऱ्या व्याजदरापेक्षा जास्तीचा परतावा देऊ शकतो. वित्त-शास्त्रा

विषयी योग्य ज्ञान असल्याकारणाने आणि त्याविषयी समजुतदारपणे चर्चा करत राहिल्याने या व्यक्तींचा सहवास तुम्हाला नेहमीच आवडू लागतो.

3. बघ्याची भूमिका घेणारे गुंतवणूकदार

या प्रकारातील व्यक्तींना बाजारात आलेल्या गुंतवणूक उत्पादनाविषयी माहिती आधीच मिळाली असते तरी देखील त्या प्रकारच्या गुंतवणुकीमध्ये गुंतवणूक करण्याचा सहभाग ते घेत नाही. ते सतत वित्त-शास्त्रा विषयी त्यांची मते मांडण्याचा आणि सखोलपणे त्यावर चर्चा करण्याचा प्रयत्न करीत असतात, तरीदेखील त्यांचे स्वतःचे पैसे गुंतवणूक करण्याचे धाडस कधी करत नाहीत. शेअर बाजाराच्या बाहेर बसून आणि स्वतःचे पैसे न गुंतवुन, गुंतवणूकदारांनी कशा प्रकारे त्यांच्या गुंतवणूक कराव्यात यावर सतत भाष्य करण्यामध्ये त्यांना अधिक रस असतो.

4. हंगामी गुंतवणूकदार

या प्रकारातील गुंतवणूकदार अत्यंत अनुभवी असतात तरी देखील त्यांच्या गुंतवणुकी मधून हवा तसा परतावा त्यांना मिळाला नसतो. शेअर ब्रोकिंग कंपनी मध्ये काम करणारे कर्मचारी किंवा व्यावसायिक गुंतवणूकदार या प्रकारांमध्ये मोडतात. गुंतवणूक जगतात घडणारी कोणतीही घटना ही सर्वात प्रथम त्यांच्या कानावर पडते अशा विश्वामध्ये हे जगत असतात. बाजारात येणाऱ्या योग्य संधीची ते वाट पाहत आहेत असे सर्वांना सतत दाखवून देण्याचा प्रयत्न करत असतात. त्यांच्या गुंतवणुकीमध्ये अनियमितता आणि सातत्याचा अभाव सतत पाहायला मिळतो. ते शेअर बाजारात शेअर्सची खरेदी आणि विक्री सतत करण्याचा प्रयत्न करत असतात त्यामुळेच त्यांना समाधानकारक परतावा कधीच मिळत नाही.

5. परिस्थितीचे बळी पडलेले गुंतवणूकदार

गुंतवणूक उत्पादन दलालांचे मित्र आणि नातेवाईक या प्रकारांमध्ये गणले जातात. सकाळी 9 ते 5 या वेळेमध्ये नोकरी करणारा नोकरदार देखील या प्रकारात मोडतो. विमा एजंट त्यांच्या विक्री लक्ष्या साठी या व्यक्तींना सतत नवीन येणारे गुंतवणूक उत्पादन देण्याचा प्रयत्न करीत असतात. गुंतवणुकीचा सल्ला या व्यक्ती कोणत्याही सडक छाप व्यक्तींकडून घेण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यामध्ये ते जेथे काम करीत असतात तेथील त्यांचे सहयोगी आणि त्यांचे मित्र यांचा समावेश असतो. यांचा सल्ला घेऊन आपण एक दिवशी श्रीमंत होऊ असा त्यांचा गैरसमज असतो. विमा एजंट आणि शेअर ब्रोकर त्यांच्या पैशावर सतत मजा करीत असतात.

6. यशस्वी उद्योजक असलेला गुंतवणूकदार

या प्रकारातील गुंतवणूकदार त्याच्या उद्योगधंद्यामध्ये अत्यंत यशस्वी असतो आणि त्याचा असा ठाम विश्वास असतो की गुंतवणुकी मध्ये देखील त्याला अशाच प्रकारचे यश सहज साध्य करता येऊ शकते. गुंतवणुकीचे सर्व ज्ञान माझ्याजवळ आहे आणि मला कोणत्याही प्रकारच्या सल्ल्याची गरज नाही हा आजार त्यांना झाला असतो. सर्व मालमत्ता वर्गा मध्ये गुंतवणूक करण्याचे सखोल ज्ञान त्यांच्याजवळ आहे असे ते त्यांच्या आर्थिक सल्लागाराला दाखवत असतात.

7. शांत डोक्याने विचार करणारे गुंतवणूकदार

या प्रकारातील गुंतवणूकदार मनाने स्थिर आणि कोणत्याही परिस्थितीत न घाबरणारे असतात. त्यांच्या वर्तणुकीवर त्यांचा आत्मविश्वास सतत दिसत असतो. आर्थिक सल्लागाराचा सल्ला मनापासून ऐकण्याची ते नेहमी तयारी दर्शवितात आणि त्या सल्ल्यावर

सखोलपणे विचार देखील ते करतात. गुंतवणुकीचे कोणतेही अंतिम निर्णय हे ते त्यांच्या मनाला पटतील त्याप्रमाणेच घेतात आणि घेतलेल्या निर्णयावर ठामपणे अंमलबजावणी देखील करतात. आर्थिक नियोजनामध्ये ते नेहमीच शिस्तबद्ध दृष्टिकोनाचे अनुकरण करतात आणि कोणत्याच प्रकारच्या संशयास्पद योजनेमध्ये गुंतवणूक करीत नाहीत. त्यांना त्यांच्या गुंतवणुकीमध्ये पारदर्शकता ठेवायला आवडते. दीर्घकालीन गुंतवणुकीमध्ये कोणत्या प्रकारचे फायदे असतात याची संपूर्ण कल्पना त्यांना असते. त्यादृष्टीने त्यांची वाटचाल देखील सुरू असते. आर्थिक नियोजन करते वेळी असेट अलोकेशन चे महत्व काय आहे हे त्यांना माहित असते. या प्रकारातील गुंतवणूकदाराची मानसिकता दीर्घ काळामध्ये संपत्ती निर्माण करण्याची असते.

गुंतवणूकदार गुंतवणूक करताना नेहमीच काही ना काही चुका करीत असतो. त्यामधील 10 प्रमुख चुका आम्ही येथे दाखवत आहोत. प्रत्येक गुंतवणूकदार कधी ना कधी तरी या चुका करीत असतो. या 10 चुका गुंतवणुकीच्या दरम्यान जर गुंतवणूकदाराने करणे टाळले तर तो एक यशस्वी गुंतवणूकदार होऊ शकतो.

1. योजना न आखता गुंतवणूक करणे

बऱ्याच व्यक्ती वेगवेगळ्या गुंतवणूक उत्पादनांमध्ये गुंतवणूक करतात पण त्यांच्याजवळ कोणत्याच प्रकारची योजना उपलब्ध नसते. इन्शुरन्स आणि म्युच्युअल फंड या प्रकारांमध्ये गुंतवणूक केल्यानंतर देखील त्यांच्याजवळ कोणत्याच प्रकारचे आर्थिक ध्येय नसते. खूप साऱ्या इन्शुरन्स पॉलिसी आणि म्युच्युअल फंड स्कीम एकाच वेळी त्यांच्या गुंतवणुकी मध्ये पाहिल्या जातात पण त्या सर्व गुंतवणूक एकत्रित का आहेत याचे अचूक उत्तर त्यांच्याजवळ नसते. ज्यावेळेस आम्ही आमच्या ग्राहकांना विचारतो की तुम्ही इतक्या साऱ्या स्किम्स

मध्ये किंवा इन्शुरन्स पॉलिसी मध्ये गुंतवणूक करण्याचे कारण काय आहे? त्यावेळेस त्यांच्याजवळून वेगवेगळ्या प्रकारांचे समर्थन केले जाते.

2. कमी कालावधीसाठी गुंतवणूक करणे

बऱ्याच व्यक्ती ही गोष्ट विसरून जातात की संपत्ती निर्मिती करायची असेल तर एक महत्त्वाची गोष्ट तुमच्या जवळ असणे फार गरजेचे आहे आणि ती म्हणजे 'योग्य वेळ'. निवृत्त होण्याचा कालावधी आणि मुलांच्या उच्च शिक्षणाचा कालावधी बराच लांब असून देखील या व्यक्तींना कमीत कमी वेळामध्ये जास्तीत जास्त परतावा मिळवण्याचा हव्यास असतो. झटपट पैसा मिळवण्याच्या हव्यासापोटी ते फ्युचर्स आणि ऑप्शन, इंट्राडे या प्रकारामध्ये अयोग्य जोखीम सतत घेत असतात.

3. चांगल्या कामगिरीचा सतत पाठलाग करणे

बऱ्याच व्यक्तींचा गुंतवणूक करतेवेळी मागील वर्षी उत्तम कामगिरी केलेल्या स्कीम मध्ये गुंतवणूक करण्याचा कल असतो. गत कामगिरी पाहून गुंतवणूक करताना भविष्यातील कामगिरीचे मोजमाप करणे अत्यंत धोकादायक होऊ शकते. अमुक एका स्कीम मध्ये गुंतवणूक करण्यापूर्वी त्या स्कीमची गेल्या पाच ते दहा वर्षाची कामगिरी पडताळून गुंतवणूक करणे फायदेशीर ठरू शकते पण त्याच एका गोष्टीवर तुम्ही संपूर्णपणे अवलंबून राहू शकत नाही.

4. मार्केट रोज पाहिल्याने जास्तीचा परतावा मिळू शकतो

शेअर मार्केट रोज पाहिल्याने आणि सतत त्याचा अंदाज घेऊन गुंतवणूक केल्याने जास्तीत जास्त परतावा मिळू शकतो अशी सामान्य

चूक गुंतवणूकदार बऱ्याच वेळी करतो. शेअर मार्केट एक अथांग सागर आहे आणि याचा अचूक अंदाज घ्यायला कोणालाही जमणार नाही. अनुभवी निधी व्यवस्थापक (Fund Manager) देखील मार्केटच्या पुढील वाटचालीचा अचूक अंदाज घेऊ शकत नाही. जितके जास्तीत जास्त गुंतवणूकदार मार्केटच्या पुढील वाटचालीचा अचूक अंदाज घेण्याचा प्रयत्न करतील, भविष्यात तितकाच कमी परतावा त्यांच्या गुंतवणुकीला मिळेल. मार्केटची अचूक वेळ आणि दिशा ठरवण्यापेक्षा काही चांगल्या कंपनीचे शेअर्स विकत घेऊन, जास्तीत जास्त वर्ष त्याला तुमच्या पोर्टफोलियोमध्ये ठेवल्याने तुम्हाला चांगला परिणाम दिसू लागेल.

5. विमा आणि गुंतवणुकीला एकत्रित करणे

कोणत्याही व्यक्तीच्या जीवनामध्ये वर्तमान काळात एखादी दुर्दैवी घटना घडू शकते. समजा त्या घरांमध्ये कमावणारी एकमेव व्यक्ती आहे आणि त्या व्यक्तीच्या निधनानंतर येणाऱ्या आर्थिक संकटाला सामोरे जाण्यासाठी विमा घेणे योग्य आहे. विमा हा वर्तमान काळातील आर्थिक संकटांना तोंड देण्यासाठी एक उत्तम उत्पादन आहे. त्याचा उपयोग भविष्यातील आर्थिक ध्येय साध्य करण्यासाठी करू नये. याच्या उलट जर एखाद्या व्यक्तीच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी वीस वर्षानंतर एक ठराविक रक्कम हवी असेल तर भविष्यातील या आर्थिक ध्येयासाठी गुंतवणूक हा उत्तम पर्याय असेल. गुंतवणूक आणि विमा ही दोन वेगवेगळी उत्पादने आहेत. त्यांना एकत्रित केल्यानंतर तुमचे मूळ ध्येय केव्हाच साध्य होणार नाही. विमा गरजेसाठी टर्म प्लॅन खरेदी करणे हा एक उत्तम निर्णय राहील.

6. गुंतवणूक करतेवेळी इतरांचे अनुकरण करणे.

गुंतवणूक हा फुटबॉल सारखा सांघिक खेळ नाही आहे, जिथे संघाने एकत्रित येऊन त्यांची योजना आखून त्याप्रमाणे खेळ करणे बंधनकारक आहे. बहुतेक वेळा असे पाहिले जाते गुंतवणूक करते वेळी बऱ्याच व्यक्ती आपल्या मित्र परिवारांच्या गुंतवणूक पाहून त्याचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करतात. याउलट गुंतवणूक हा बुद्धिबळा सारखा आहे जिथे तुमच्या योजना तुमच्या गरजेप्रमाणे आणि परिस्थितीप्रमाणे आखाव्या लागतील. प्रत्येक व्यक्तीच्या गरजा या वेगवेगळ्या आहेत आणि त्या गरजेप्रमाणे बऱ्याच व्यक्ती त्यांची गुंतवणूक योजना बनवत नाही.

7. गुंतवणुकीमध्ये सतत बदल करत राहणे

कोणतीही योजना न आखता किंवा जास्तीचा परतावा मिळवण्यासाठी पोर्टफोलियो मध्ये वारंवार बदल करणे योग्य रणनीती नाही आहे. बऱ्याच व्यक्तींना त्यांच्या गुंतवणुकीमध्ये वारंवार बदल करण्याची सवय असते. त्यांचा असा गैरसमज असतो की या प्रक्रियेमुळे त्यांच्या पोर्टफोलियोमध्ये जास्तीचा परतावा मिळू शकतो. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे नियोजित कालावधीमध्ये त्यांना ठरविलेला परतावा मिळाला नाही तर ते त्या गुंतवणुकीमध्ये वारंवार बदल करण्याचा प्रयत्न करतात. या प्रक्रियेमुळे त्यांच्या परताव्या मध्ये वाढ होण्याऐवजी त्यांच्या करा मध्ये आणि इतर शुल्कामध्ये (उदाहरणार्थ एक्झिट लोड) वाढ होते. त्याच बरोबर म्युचल फंड डिस्ट्रीब्यूटर आणि बँकर्स त्यांच्या विक्री लक्ष्यासाठी (Sales Target) ग्राहकांना त्यांच्या पोर्टफोलियोमध्ये वारंवार बदल करण्याचा सल्ला देत असतात. त्यांच्या या सल्ल्यामुळे गुंतवणूकदाराने त्यांच्यापासून लांब राहणे योग्य आहे.

8. परताव्याच्या अवास्तविक अपेक्षा

कोणत्याही मालमत्तेमध्ये मिळणारा परतावा हा देशाच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असतो. जर महागाई दर जास्त असेल तर बँकेच्या डिपॉझिट जास्तीचा परतावा देतात आणि जर महागाई दर कमी असेल तर त्या कमी परतावा देतात. इक्विटी मालमत्ता वर्गामध्ये मिळणारा कमी किंवा जास्तीचा परतावा हा देशाच्या आर्थिक प्रगतीवर अवलंबून असतो. गुंतवणूक दारांनी जास्तीचा परतावा मिळवण्यासाठी केलेल्या गुंतवणुकीमध्ये त्यांना सतत अपयश आलेले असते. या अपयशाचे मूळ कारण त्यांनी त्यांच्या परताव्या कडून अवास्तविक अपेक्षा करणे हे आहे.

9. झालेला तोटा न स्वीकारण्याची वृत्ती

जर तुम्ही चुकीच्या दिशेने वाहन चालवीत आहात हे तुमच्या निदर्शनास आले तर तुम्ही काय कराल? सहाजिकच आहे तुमचे वाहन तुम्ही योग्य दिशेने चालवायला लागाल जरी तुम्हाला त्या दिशेने बराच वेळ आणि पैसा खर्च होणार असेल. जर तुम्ही असे केले नाही तर काही वेळाने तुमच्यावर तुमचा जीव गमावण्याची वेळ देखील येऊ शकते. ज्यावेळेस गुंतवणुकीच्या बाबतीत असे पाहायला मिळते त्यावेळेस गुंतवणूकदार त्याचा मार्ग आणि दिशा बदलण्याची तयारी दर्शवीत नाही. आम्ही बऱ्याच गुंतवणूकदारांच्या पोर्टफोलियो मध्ये 100 पेक्षा जास्त म्युचल फंड स्किम्स आणि 50 पेक्षा अधिक शेअर्स पाहिले आहेत. आम्ही ज्या वेळेस त्यांना नको असलेल्या किंवा तोटा देत असलेल्या स्कीम्स आणि शेअर्स विकण्याचा सल्ला दिला, त्यावेळेस त्यांनी त्या विकण्यास त्यांची तयारी दर्शवली नाही. आमचा तुम्हा सर्वांना सल्ला असेल ज्या वेळेस तुम्हाला चुकीच्या गुंतवणुकीमध्ये तुम्ही गुंतवणूक केली आहे हे कळेल त्यावेळेस तुम्ही तुमची चूक कबूल करून त्या गुंतवणुकी मधून बाहेर पडणे अत्यंत जरुरी आहे.

10. सतत पोर्टफोलियो ची देखरेख करणे

बऱ्याच व्यक्तींना त्यांचा पोर्टफोलिओ वारंवार बघण्याची सवय असते. आम्ही बऱ्याच वेळा असे पाहिले आहे की गुंतवणूकदार दररोज त्यांचा पोर्टफोलिओ पाहिल्या शिवाय झोपत नाही. त्यांना पोर्टफोलियो दररोज पाहण्याचे व्यसन जडले असते. गुंतवणूकदाराने त्याच्या पोर्टफोलियो मध्ये वाढ आणि अधिक फायदा मिळवण्यासाठी या गुंतवणुकीला वेळ देणे फार गरजेचे आहे. पोर्टफोलिओ ची अतिप्रमाणात देखरेख करणे याचा अर्थ असा होतो की गुंतवणूकदार भावनिक दृष्ट्या मार्केटच्या हालचालीमध्ये गुंतला आहे, गुंतवणूकदारांना जास्तीचा परतावा न मिळण्याचे मुख्य कारण म्हणजे ते अति प्रमाणामध्ये त्यांच्या पोर्टफोलिओ ची देखरेख करीत असतात.

वरील 10 चुका तुम्ही गुंतवणूक करण्यापूर्वी जर टाळल्या तर तुम्ही एक यशस्वी गुंतवणूकदार होऊ शकता. प्रत्येक गुंतवणूकदाराची एक विशिष्ट प्रकारची मानसिकता असते. तुम्हाला तुमच्या गुंतवणुकी मधून उत्तम संपत्ती निर्माण करायची असेल तर या लेखामध्ये दिलेले जे नियम आहेत त्यांचे तंतोतंत पालन करणे फार गरजेचे आहे. त्याचबरोबर तुम्हाला उत्तम संपत्ती निर्माण करण्यासाठी एक अनुभवी आणि चांगल्या आर्थिक नियोजनकाराची वेळोवेळी मदत घेणे फारच गरजेचे आहे.

पुस्तक परिचय

पाणी, ऑक्सिजन आणि अन्ना नंतर पैसा हा जगातील सर्वात महत्त्वाची वस्तू आहे. पण तरीदेखील बहुतांश लोक त्यांच्या पैशाच्या नियोजनाला पुरेसा वेळ देत नाही. शालेय जीवनामध्ये आणि उच्च शिक्षणामध्ये जवळपास अठरा ते वीस वर्ष घालवल्यानंतर देखील आपल्याला आर्थिक साक्षरता आपल्या जीवनामध्ये किती महत्त्वाची आहे हे कोणी शिकवलं नाही. लेखक नितीन घाडगे आणि धनश्री सगरे यांनी या पुस्तकांमध्ये आर्थिक स्वातंत्र्य साध्या आणि सोप्या पद्धतीने कसे मिळवायचे हे दिले आहे. बऱ्याच व्यक्ती त्यांच्या आर्थिक जीवनामध्ये अयशस्वी का होतात याची प्रमुख कारणे देखील या पुस्तकामध्ये दिली आहेत. श्रीमंत होण्यासाठी एका विशिष्ट मानसिकतेची गरज आहे, ही मानसिकता कशा पद्धतीने विकसित करायची याचे उत्तर या पुस्तकात तुम्हाला मिळेल. बऱ्याच व्यक्ती गुंतवणूक करण्यापूर्वी कोणत्याच प्रकारचं आर्थिक उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवत नाही. त्यामुळे त्या व्यक्ती त्यांच्या आयुष्यामध्ये दीर्घकालीन संपत्ती बिलकूल मिळवू शकत नाही. लेखकांनी आर्थिक नियोजन करून एक सर्वसामान्य व्यक्ती देखील कशा पद्धतीने संपत्ती निर्मिती करू शकते याचे रहस्य या पुस्तकात दिले आहे.

लेखका विषयी थोडे

नितीन घाडगे:

लेखक नितीन घाडगे यांनी एका मध्यमवर्गीय कुटुंबामध्ये जन्म घेतला, शिक्षण पूर्ण केल्यानंतर इतर मध्यम वर्गीय व्यक्ती प्रमाणेच नोकरी करायला सुरुवात केली. बँकेत नोकरी करत असताना त्यांना या गोष्टीची प्रकर्षाने जाणीव झाली, लोक पैशाचे नियोजन फार चुकीच्या पद्धतीने करीत आहे. बँकेतील नोकरी सोडून, त्यांनी या विषयामध्ये प्राविण्य मिळवले आणि पूर्णवेळ या व्यवसायामध्ये आले. भारतातील काही अग्रगण्य आर्थिक प्रशिक्षकां मध्ये त्यांचे नाव गणले जाते. पैशाचे योग्य पद्धतीने नियोजन करून तुम्ही आर्थिक स्वातंत्र्य कसे मिळवू शकता हे साध्या आणि सोप्या भाषेमध्ये त्यांच्या कार्यशाळेमध्ये सांगतात.

धनश्री सगरे:

मूळच्या पुण्याच्या असलेल्या धनश्री सगरे लग्नानंतर मुंबईला स्थायिक झाल्या. लग्नानंतर नोकरी करताना त्यांना सतत स्वतःचा काही व्यवसाय सुरु करावा हे डोक्यात येत होते. एक उत्तम कर तज्ञ असल्या कारणाने बऱ्याच व्यक्ती त्यांना गुंतवणूक कोठे करावे आणि कर कसा वाचवावा हे सतत विचारत असत. त्याच दरम्यान नितीन सरां सोबत यांची भेट झाली आणि त्यांनी या व्यवसायामध्ये येण्याचे ठरवले. एक उत्तम कर तज्ञ आणि एक उत्तम आर्थिक तज्ञ म्हणून त्यांची ओळख हळू हळू वाढायला लागली. आज धनश्री सगरे मॅडम यांचे नाव देखील महाराष्ट्रातील काही मोजक्याच आर्थिक तज्ज्ञांमध्ये गणले जाते.

Connect with Author:

nitin@hirannyafinplan.com

https://www.youtube.com/channel/UC4TySSQK8gqGtXZyYuRcHfA

Hirannya Fplanner

WINGS PUBLICATION
WE GIVE WINGS TO YOUR DREAM!

Also available as an e-book

NON-FICTION
ISBN 978-93-93966-41-4
9 789393 966414 >
₹699 | $15